आशियातील सर्वात मोठ्या स्वयंसेवी ग्राहक संघटनेचे मुखपत्र

RNI No. MAHBIL/2011/39044

वर्ष १० । अंक १० । जानेवारी २०२२ । मूल्य रु. ५/-

Grahak Tituka Melwawa


# ग्राहक तितुका मेळवावा

मुंबई ग्राहक पंचायत

ग्राहक हिताय ग्राहक सुखाय

Member of Consumers International

# मधुकरराव मंत्री जन्मशताब्दी विशेषांक



# व्रतस्थ

**– आप्पासाहेब गोडबोले,**
*संस्थेचे संस्थापक सदस्य*

**म**धुकरराव मंत्री यांचा माझा परिचय ते दादर भागात जनसंघाचे मोठे कार्यकर्ते म्हणून मुळात झाला होता, पण तो परिचय जुजबी होता.

ग्राहक चळवळ मुंबईत सुरू झाली त्यावेळी तिचे नाव जनता ग्राहक महासंघ असे होते व त्याची मुख्य जबाबदारी श्री. सुधीर फडके अध्यक्ष, श्री. पां. वा. गाडगीळ उपाध्यक्ष व श्री. मधुकरराव मंत्री कार्यवाह अशा तिघांनी घेतली. मुळात आम्ही उभयतां सामान्य कार्यकर्ते म्हणून चळवळीत सामील झालो पण नंतर आम्ही त्यात महत्त्वाच्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या. त्यामुळे श्री. मधुकररावांचा व आमचा संपर्क खूप वाढला. त्यांनी एकदा चळवळीत या कामाची जबाबदारी घेतल्यानंतर स्वतःला त्या कामात संपूर्ण झोकून दिले. त्यांचा मनमिळाऊ व माणसे जोडण्याचा स्वभाव असल्यामुळे त्यांनी अनेकांना या चळवळीत आणले. चळवळीचे किंवा वितरणाचे कोणतेही काम असले की ते अत्यंत उत्साहाने ते करीत. नवीन संघ बनविण्याकरिता ते उपनगरात कितीही दूर व रात्री उशीर होणार असला तरी जात असत. त्यांनी त्या काळात संघ बनविण्याकरिता अनंत भाषणे दिली असतील. संघ बनवण्याकरीता कोठेही आम्ही गेलो की तिथे त्यांच्या परिचयाचे अनेक लोक भेटत. नवीन संघ बनविण्याचे काम एखाद्या व्रतासारखे ते पार पाडीत. मुंबईतील ग्राहक चळवळ जलद वाढण्यात श्री. मधुकररावांचे योगदान फार मोठे व महत्त्वाचे होते.

त्यांच्या व्यापार संघांमधेही खूप ओळखी होत्या. त्यामुळे सुरुवातीच्या काळात घाऊक बाजारात खरेदीचे काम खूप सोपे झाले. मधुकरराव काही काळ नगरसेवक होते त्यामुळे त्यांना म्युनिसिपालिटीच्या कामाच्या पद्धतीची चांगली माहिती होती आणि तिथे त्यांच्या ओळखीही खूप असत. या सर्वांचा आम्हाला आमच्या कामात फार उपयोग होई. ♦

# जगन्मित्र

**– मुकुंदराव गोविलकर**
*जनता मध्यवर्तीचे माजी कार्याध्यक्ष*

**सा**धारण १९६२-६३ साल असावं. व्यवसायाच्या जमाखर्चाच्या काही कामासाठी माझे साडू शाम अरगडे यांच्या कार्यालयात गेलो असता एका भारदस्त, हसतमुख व्यक्तिमत्वाशी गाठ पडली. ओळख झाल्यावर हस्तांदोलन करताना प्रकृतीने सुदृढ असूनही माझा हात त्या व्यक्तीच्या हातात मुलाचा वाटत होता. अशा मधुकररावांचा झालेला परिचय उत्तरोत्तर वाढतच गेला. त्या काळात ते जनसंघाचे कार्यकर्ते तसेच नगरपिता होते आणि राजकारणात पुढे येत होते. तिथेच राहते तर कायमचे 'मंत्री' असलेले मधुकरराव तात्पुरते मंत्री होण्याचीही शक्यता होती. परंतु भविष्य निराळे होते.

एकदा ओळख झाल्यावर त्या व्यक्तीला मधुकरराव क्वचितच विसरले असतील. उलट व्यक्तींची नावांसह ओळख ठेवणं हे एक वैशिष्ट्यच त्यांच्यात होते. नेहमी हसतमुख हे त्यांचं आणखी एक वैशिष्ट्य! पण हे हसणं कधीही कृत्रिम नसे तर ते मनापासून आणि स्वाभाविक!

आमची जुनी ओळख १९७६ मध्ये ग्राहक संघाच्या माध्यमाने वाढली आणि मी व नीला दोघांनाही त्यांनी आपल्या कार्यकारी मंडळात सामील करून घेतलं. माणसं हेरून त्यांना आपलंसं करणं आणि आपल्या कामात सामील करून घेणं हेही मधुकररावांचं वैशिष्ट्य. गोडबोले पती-पत्नीप्रमाणे गोविलकर पती-पत्नी बघता-बघता संघटनेचा भाग बनून गेले.

तसे ते वयाने बुजुर्ग, परंतु वय आमच्या संबंधात आड आलं नाही. राजकारणात 'पुढारी' म्हणून वावरले तरी मधुकरराव वागणुकीने कधीच पुढारी झाले नाहीत. सहकाराने काम करायचं म्हणजे सर्वजण सहकारी हे ते कधीही विसरले नाहीत. कोणतंही काम करायला सदैव तयार! अगदी झाडू मारणं, बैठका घालणं अशा कामातही ते सर्वांबरोबर असत.

संघटना ही केंव्हाही मोठी असते कारण तिच्यासाठी अनेक हातांचा उपयोग झालेला असतो. परंतु काही व्यक्ती अशा असतात की त्यांच्यावाचून संघटना हे चित्र मनाला पटत नाही. मधुकरराव असे होते.

♦

## मुंबई ग्राहक पंचायत

**विश्वस्त मंडळ**

डॉ. अनिल काकोडकर
डॉ. बाळ फोंडके
ललिता कुलकर्णी
रविंद्र महाजन
अनुराधा गोरे

**अध्यक्ष**

डॉ. बाळ फोंडके

**उपाध्यक्ष**

अनुराधा गोरे

**कार्यकारी मंडळ**

ॲड. शिरीष देशपांडे (स्वीकृत कार्याध्यक्ष)
अनुराधा देशपांडे (कार्योपाध्यक्ष)
प्रभाकर गवाणे (कार्योपाध्यक्ष)
अनिता खानोलकर (कार्यवाह)
छाया वारंगे (कार्यवाह)
रविंद्र सहस्रबुद्धे (खजिनदार)

**सभासद**

ज्योती मोडक, शीला देवळेकर
राजेंद्र राणे, शुभदा चौकर,
अनघा आचरेकर, विनायक सोमण,
गजानन वर्तक, विवेक केळकर,
शर्मिला रानडे, आलोक हर्डीकर (स्वीकृत),
अभय जोशी, पराग रेडकर,
अर्चना पानगांवकर (स्वीकृत)

**निमंत्रित**

- *अध्यक्ष, खरेदी समिती*
- *शिक्षण विभाग प्रमुख*
- *समन्वयक पर्यावरण विभाग*

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक/संघटना सहमत असतीलच असे नाही.


# अनुक्रमणिका


**ग्राहक तितुका मेळवावा**
१ जानेवारी २०२२
मार्गशीर्ष/पौष १९४३



| | |
|---|---|
| व्रतस्थ | २ |
| जगन्मित्र | २ |
| दुर्मिळ नेतृत्वगुण | ४ |
| संपादकीय | ५ |
| ‘ग्राहक राजा’चे मंत्री | ६ |
| एक मनमिळावू, प्रेरणादायी नेतृत्व | ८ |
| पायाभरणी– संस्थेची व वास्तूचीही! | ९ |
| अखंड आनंदाची देव–घेव | १० |
| आशावादी व जिद्दी | ११ |
| उत्साही आणि संयमी | १२ |
| सत्शील व समाजशील | १७ |
| सक्षम नगरपिता | १८ |
| आमचे बापू – उत्तुंग व्यक्तिमत्त्व | १९ |
| माझ्या आठवणीतले बापू | २१ |
| Compassionate! | २२ |
| MGP was his Passion | २३ |
| ग्राहक हिताय, ग्राहक सुखाय... | २४ |
| घडामोडी – महारेरा विषयक | २५ |


**मुखपृष्ठ – रेखाचित्रकार, पल्लवी मंत्री वाघ (मधुकर मंत्री यांची नात)**

मुंबई ग्राहक पंचायतीचे संस्थापक कै. मधुकरराव मंत्री यांची जन्मशताब्दी २६ जानेवारी २०२२ या दिवशी आहे. त्याच दिवशी त्यांच्या स्मृतीला वंदन करण्यासाठी, संस्थेतर्फे एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी केंद्रीय मंत्री व उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल मा. श्री. राम नाईक उपस्थित राहणार आहेत. ‘मधुकर मंत्री पुरस्कार’ही याच कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहेत.
अंधेरी पश्चिम येथील विद्यानिधी हायस्कूलमध्ये सायंकाळी ४ ते ७ या वेळेत सदर कार्यक्रम केवळ मर्यादित निमंत्रितांच्या उपस्थितीत होईल. या कार्यक्रमात ऑनलाईन सहभागी होण्यासाठी लिंक सर्वांना देण्यात येईल.


❖ **संपादक :– शुभदा चौकर**
❖ **संपादकीय साहाय्य :– रंजना मंत्री, मंगला गाडगीळ, शर्मिला नाईक**
❖ **सल्लागार :– ॲड. शिरीष देशपांडे, वसुंधरा देवधर**
❖ **मुखपृष्ठ :– राजेंद्र राणे**
❖ **अक्षरजुळणी व रचना, कला व मुद्रण :– इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई**

Printed & Published by **NISHIKANT VINAYAK GURJAR** on behalf of **Mumbai Grahak Panchayat,** Printed at India Printing Works, 42 G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031 and Published at Mumbai Grahak Panchayat, Grahak Bhawan, Sant Dnyaneshwar Marg, JVPD Scheme, Juhu, Vile Parle (West), Mumbai - 400 056 Ph.: 26288624, 26281832, Fax : 26250916. • Email : mpanchayat@gmail.com • Vitaran Email : mgpvitaran@yahoo.co.in • Website: **mymgp.org** • Editor : **Shubhada Chaukar**

# दुर्मिळ नेतृत्वगुण

– ॲड. शिरीष देशपांडे, *कार्याध्यक्ष*

**आ**युष्यातील काही नाती ही अतूटच असतात. हे व्यक्तींच्या बाबतीत जितके खरे तितकेच व्यक्ती आणि संस्थांच्या बाबतीतही खरे असल्याचे दिसून येते. परंतु दुर्दैवाने अशी उदाहरणे आजच्या समाजात दुर्मिळच. मधुकरराव मंत्री आणि मुंबई ग्राहक पंचायत या दोघांमधील नाते हे मधुकररावांच्या शेवटच्या श्वासापर्यंत असेच अतूट राहिले.

मुंबई ग्राहक पंचायत म्हणजे मधुकररावांचे विस्तारीत कुटुंबच होते आणि म्हणूनच आम्हा सर्व तरुण कार्यकर्त्यांना मधुकरराव हे पितृतुल्य होते. ते ग्राहक पंचायतीच्या कामात इतके विरघळून गेले होते की मुंबई ग्राहक पंचायत म्हणजे मधुकरराव असं एक समीकरणच झालं होतं. म्हणूनच मधुकरराव म्हणजेच मुंबई ग्राहक पंचायत असंही चित्र दिसायचं. असं चित्र जेव्हा दिसतं तेव्हा काही संस्थात्मक धोके निर्माण होतात. अशी परिस्थिती ही एकाधिकारशाहीला जन्म देते. पण मधुकररावांचं एकमुखी नेतृत्व सर्वांनाच मान्य असलं तरी त्यांची कार्यपद्धती अशी की निर्णयप्रक्रियेत सर्व कार्यकर्त्यांना ते सहभागी करून मग निर्णय घ्यायचे. मधुकररावांनी कार्यकर्त्यांचे त्यांच्यावरील प्रेम, निष्ठा यांचा आदर करत निर्णयप्रक्रिया सर्वसमावेशक ठेवली. भले निर्णय घ्यायला विलंब झाला तरी चालेल, पण सांगोपांग चर्चा करूनच निर्णय घेण्यावर मधुकररावांचा भर होता.

मधुकररावांचं संघटनेला लाभलेलं नेतृत्व ही एक फार मोठी भाग्याची गोष्ट आहे असं मी समजतो. प्रत्येक सामाजिक संस्थेची अशी एक कार्यशैली असते. त्याचप्रमाणे त्या संस्थेची स्वतःची अशी एक संस्कृतीही असते. ही संस्कृती आणि कार्यशैली प्रामुख्याने त्या संस्थेच्या संस्थापकांनी घडवलेली असते. आज ४६ वर्षांत विविध आव्हानांना तोंड देत मुंबई ग्राहक पंचायतीची जी गौरवशाली प्रगती झाली त्यात मधुकररावांचे योगदान हे अविस्मरणीय आहे. आज संस्थेत कार्यरत असलेल्या अनेक कार्यकर्त्यांना मधुकररावांबरोबर काम करण्याची संधी मिळालेली नाही. मला ती संधी मिळाली हे मी माझे फार मोठे भाग्य समजतो.

मधुकररावांकडून शिकण्यासारख्या अनेक गोष्टी होत्या. प्रत्येकाला त्या आत्मसात करता येतीलच असे नाही. पण एक मात्र निश्चित की मधुकररावांनी संस्थेला सुरुवातीपासून दिलेले नेतृत्व, त्यांनी माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांच्या मनावर कोरलेले संस्कार यामुळेच मुंबई ग्राहक पंचायत आज यशाची अनेक शिखरे सर करू शकली आहे. मधुकररावांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मी त्यांच्या पुण्यस्मृतीला आदरपूर्वक वंदन करतो. ♦

## श्रद्धांजली



मुंबई ग्राहक पंचायत पालघर वितरण केंद्रांच्या विद्यमान कार्यकारणीचे सदस्य श्री. परशुराम बाबुराव ठाकूर यांचे दिनांक ९ नोव्हेंबर २०२१ रोजी हृदयविकाराने दुःखद निधन झाले. ते एप्रिल २०१४ ते मार्च २०१७ ह्या काळात मुंबई ग्राहक पंचायत पालघर विभागाच्या कार्यकारणीचे सदस्य होते. तसेच एप्रिल २०१७ पासून मुंबई ग्राहक पंचायत पालघर वितरणाचे कार्यकारिणी सदस्य म्हणून कार्यरत होते. ज्ञानदीप संघ माकुणसार या संघाचे संघप्रमुख म्हणून काम पाहत होते.

## वाटपातील नवीन संघ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | पालघर | सागर कन्या ग्राहक संघ | 16151 PL | सदस्य 07 |
| 2. | पालघर | शिवनेरी ग्राहक संघ | 16300 PO | सदस्य 09 |
| 3. | पालघर | उर्मी ग्राहक संघ | 16543 PO | सदस्य 09 |
| 4. | पेण | शांतिनिकेतन ग्राहक संघ | 17187 RG | सदस्य 07 |
| 5. | ठाणे | बंगश्री ग्राहक संघ | 15442 TN | सदस्य 13 |
| 6. | ठाणे | बर्च ग्राहक संघ | 15641 TN | सदस्य 14 |
| 7. | ठाणे | आपला ग्राहक संघ | 15640 TN | सदस्य 12 |
| 8. | ठाणे | मिलान ग्राहक संघ | 15639 TN | सदस्य 11 |
| 9. | मुंबई | हनुमान रामानंद ग्राहक संघ | 31230 VP | सदस्य 09 |
| 10. | मुंबई | निसर्ग ग्राहक संघ | 22519 VK | सदस्य 08 |

संपादकीय

# मधुर संगोपक!

**स**न १९७४. देशात अराजक माजले होते. टंचाई व महागाईने ग्राहक त्रस्त झाले होते... रचनात्मक ग्राहक चळवळीचा श्रीगणेशा बिंदुमधव जोशी यांनी पुण्यात केला होता. योग्य वेळी, योग्य पाऊल उचलले गेले होते. पुण्यात वर्ष-दीड वर्षात २६५ ग्राहक संघ उभे राहिले होते. पुण्यातील उद्‌घाटनच्या कार्यक्रमाला ख्यातनाम न्यायाधीश व केंद्रीय मंत्री एम. सी. छागला यांना घेऊन येण्याची जबाबदारी स्वीकारली होती मधुकरराव मंत्री यांनी. बिंदुमाधव जोशी व सुधीर फडके यांच्या पुढाकाराने पुण्यात ग्राहक संघटन बांधले जात असताना मधुकरराव मंत्री या दोघांचे सुहृद आणि रा. स्व. संघाचे स्वयंसेवक म्हणून त्यात सामील झाले होते.

१६ मार्च १९७५ रोजी मुंबईतील स्काऊट हॉलमध्ये जाहीर सभा भरवण्यात आली. तिथे मुंबईतील ग्राहक पंचायतीचा पाया रचला गेला. मुंबईतील कामाची जबाबदारी तिघांनी घेतली. अध्यक्ष- सुधीर फडके, उपाध्यक्ष- पा. वा. गाडगीळ, कार्यवाह- मधु मंत्री. त्या सभेनंतर लगोलग २८ ग्राहक संघ' स्थापन झाले. वर्षभरात ग्राहक संघांची संख्या ६०-७०च्या पुढे गेली. आप्पासाहेब व प्रतिभाताई गोडबोले, अशोक रावत यांसह अनेक सेवाव्रती कार्यकर्ते मधुकर मंत्री हेरत गेले. गुणी कार्यकर्त्यांचा गुणाकार होत राहिला. ग्राहकांचे संघटन सातत्याने होत राहावे म्हणून मधु मंत्री व त्यांच्या टीमने ध्यासपंथ अनुसरला होता.

रा. स्व. संघातील घडण, जनसंघामुळे असलेला अफाट जनसंपर्क, उत्तम नगरसेवक म्हणून कमावलेली सामाजिक पत, सुसंस्कृत व लोभस व्यक्तिमत्त्व, संघटन कुशलता आणि ही चळवळ रुजवण्याचा ध्यास अशा गुणांचा समुच्चय असलेले मधुकरराव लाभले म्हणून आपली संस्था उदयाला आली आणि घट्ट रुजली. मूळ जन्मभूमीपेक्षा मुंबईतले कलम अधिक बहरले! मधुकररावांनी त्यांच्या स्वभावातील गोडवा, गुणी माणसे वेचून त्यांना एकत्र ठेवण्याची क्षमता, आणि डोक्यात सतत संस्थेच्या भल्याचा भुंगा अशाने संस्था वाढवत नेली. अत्यंत वत्सलतेने त्यांनी आपल्या संस्थेचे संगोपन केले आणि तिला सुदृढ व सक्षम बनवले. गीतरामायणातील, 'सेतू बांधा रे..' गाण्यातील जोशपूर्ण पंक्तीप्रमाणे या गाण्यात एक कडवे आहे-

सेतू नच हा क्रतु (यज्ञ) श्रमांचा,
विशाल हेतू श्रीरामांचा
महिमा त्यांच्या शुभनामांचा
थबकुनि बघती संघकार्य हे, स्तब्ध दिशा चारी...

...हे कवन मधु मंत्री आणि त्यांच्या सहकाऱ्यांनाही लागू होते जणू!

आता, २६ जानेवारीला त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाची सांगता होत असताना त्यांच्या गुणांची व कर्तुत्वाची स्मृती जागवणारा हा विशेषांक आपण प्रसिद्ध करत आहोत. या अंकातील प्रत्येक लेखातून त्यांच्या पैलूदार व्यक्तिमत्त्वाचे अनेक कंगोरे आपल्या लक्षात येतील. मधु मंत्री यांच्या स्नुषा आणि आपल्या निष्ठावान कार्यकर्त्या रंजना मंत्री यांनी गेले वर्षभर एक उत्तम उपक्रम राबवला. दर महिन्याच्या २६ तारखेला त्या त्यांच्या 'आठवणी उजळताना'ची पाने रचत गेल्या. आपल्या मासिकाचा हा विशेषांक साकारताना, आपल्या संस्थेच्या सभासदांना प्रेरक वाटतील असे काही वेचे त्यातून निवडले आहेत. काहींचे अनुभव नव्याने संकलित केले आहेत. ग्राहक भवनातील तसेच मंत्री कुटुंबाच्या संग्रहातील काही छायाचित्रेही या विशेषांकात आहेत, जी आपल्याला त्यांच्या काळात घेऊन जातील.

आपल्या संस्थेची रुजवण झाली, तेव्हा राजकीय आणीबाणीमुळे ग्राहकांसमोर आव्हाने होती. आज आर्थिक आणीबाणीसदृश परिस्थिती आहे. आपली संस्था अधिकाधिक बळकट करण्यासाठी मधु मंत्री यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या आणि कार्यशैलीच्या आठवणी जागवूया... त्या आपल्याला आजही मार्गदर्शक ठरणाऱ्या आहेत!

**- शुभदा चौकर**

# 'ग्राहक राजा'चे मंत्री

**– राम नाईक**
*माजी केंद्रीय मंत्री व उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल*

**ज**गाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला, पण चेहरा नसलेला ग्राहक हाच खरं तर अर्थव्यवस्थेचा 'राजा' असतो, अशा हजारो-हजार राजांचं राजेपण जागं करण्यासाठी आणि त्यांची सेवा करण्यासाठी अत्यंत निरपेक्ष भावनेने काम करणारे ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व म्हणजे मधुकरराव मंत्री!

मी मुंबईत आलो तो १९५४मध्ये. वर्षा-दोन वर्षातच भारतीय जनसंघाचंही काम करू लागलो. साधारणत: त्याच दरम्यान माझा आणि मधुकररावांचा परिचय झाला. नेमकं आठवू नये इतका जुना हा परिचय. १९५७च्या मुंबई महानगर पालिका निवडणुकीत गोरेगावच्या स्व. बाळासाहेब कानिटकरांच्या निवडणुकीच्या कामाची जबाबदारी मला देण्यात आली आणि मी भारतीय जनसंघाच्या कामात चांगलाच सक्रीय झालो. माझा आणि मधुकररावांचा परिचय वाढू लागला. पुढे १९६२च्या महापालिका निवडणुकीत जनसंघाने दादर मधून मधुकररावांना उमेदवारी दिली. त्यावेळी आमचे फक्त चारच नगरसेवक निवडून आले; त्यातले एक मधुकरराव! मधुकररावांची जनसंघाच्या गट नेतेपदी निवड झाली. साहजिकच, केवळ मतदार संघातीलच नव्हे तर मुंबईतील नानाविध कामं पक्षातर्फे त्यांना सांगितली जाऊ लागली. आमचा संपर्क वाढला. मीही गोरेगावचा परिघ ओलांडून मुंबई स्तरावर काम करू लागलो.

खीरा स्टील वर्क्समधील कंपनी सेक्रेटरीची नोकरी सोडून मुंबई जनसंघाचा संघटन मंत्री म्हणून मी १९६९ पासून काम करू लागलो. मुख्यालय दादरमध्ये आणि मधुकररावांचं घरही. साहजिकच आमचा स्नेह वाढला. मधुकररावांच्या घरी गेलं की त्या वास्तूचाही मला थोडा हेवा वाटे. कारण आदरणीय पं. दीनदयाळ उपाध्यायजी, अटलजी, जगन्नाथराव जोशी आदी जनसंघाच्या शीर्षस्थ नेत्यांचा पाहुणचार करणारी ती वास्तू होती. सौ. शोभनावहिनी आस्थेने सर्वांचं करायच्या. त्यांचेही या नेते मंडळींशी आपुलकीचे नाते तयार झाले होते. मला आठवतंय अटलजी पंतप्रधान असताना त्यांच्या नातवंडांपैकी कोणाचा तरी विवाह होता. अटलजींना वेळेवर कळलं आणि शक्य असलं तर ते त्यांना आशीर्वाद द्यायला येतील याचा विश्वास होता. अडचण होती ती थेट अटलजींच्या हाती पत्रिका पोचण्याची. मग सौ. वहिनींच्या विनंतीवरून तेव्हा मी स्वतः ती पत्रिका अटलजींना दिली होती. व्यग्रतेमुळे जायला जमणार नाही याचं अटलजींनाही वाईट वाटलं होतं.

मी काय, मधुकरराव काय किंवा त्यांचे बंधू श्रीराम उर्फ रामभाऊ काय, आम्हां सर्वांचेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी नाळेचे नाते! संघाने आपले दीनदयाल जी, अटलजी, अडवाणीजी, जगन्नाथराव जोशी असे अनेक बिनीचे स्वयंसेवक जनसंघाच्या कामासाठी दिले होते. संघाचा




**मुं.ग्रा. पंचायतीचे प्रणेते, मधुकरराव मंत्री चौक उद्‌घाटन सोहळा**

मुख्य भर समाज उभारणीवर असला, तरी समाजातील विविध कामांसाठी वेगवेगळ्या संघटना, संस्था उभारायला संघाने नेहमीच मदत केली. भारतीय जनसंघ, वनवासी कल्याण आश्रम, सहकार भारती, भारतीय मजदूर संघ, विद्यार्थी परिषद, विश्व हिंदू परिषद अशा नानाविध संघटना, संस्था त्यामुळेच संघ परिवारात सामावल्या गेल्या. अनेक स्वयंसेवकांनीही संघाच्या चौकटीबाहेर काम करतानाही स्वयंसेवकत्व महत्त्वाचे मानून आपणहून आपल्या संस्थांना परिवाराचा घटक मानले. 'मुंबई ग्राहक पंचायत' ही देखील अशीच एक संघ परिवारातील महत्त्वाची सदस्य संघटना.

ज्येष्ठ स्वयंसेवक आणि जनसंघाचे नेते श्री बिंदुमाधव जोशी यांनी पुण्यात १९७४ मध्ये ग्राहक संघटना उभारली. हे कार्य सर्वदूर पसरून ग्राहक हक्क सुरक्षित केले पाहिजेत या भावनेने तशीच एखादी संस्था मुंबईतही असावी असा विचार संघ परिवारात सुरु झाला. भारतीय जनसंघ, मुंबईचा संघटन मंत्री या नात्याने सदर विचार विनिमयाच्या बैठकांत मी होतोच. अशा चर्चांना बिंदुमाधवजीही पुण्याहून येत. त्यावेळी आग्रहाने त्यांनी विचार मांडला होता की अशा ग्राहक संघटनेसाठी जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचता येईल अशी मंडळी शीर्षस्थ असावीत. मात्र सर्व ग्राहकांनी याच्यात विनासंकोच सामील व्हावे यासाठी वरिष्ठ मंडळींमध्ये

राजकीय पक्षांचे पदाधिकारी असू नयेत. सर्वांनाच त्यांचे हे मत पटले. अगदी एकमताने आणि हक्काने यासाठी ज्येष्ठ स्वयंसेवक व लोकप्रिय गायक संगीतकार सुधीर फडके यांना ग्राहक संघटनेची मुहूर्तमेढ त्यांनी रोवावी असे सुचविण्यात आले. त्यांनीही अत्यंत व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून ग्राहक संघटना उभारण्याची जबाबदारी स्वीकारली. बिंदुमाधवजी मार्गदर्शनाला होतेच. जेष्ठ पत्रकार श्री. पां. वा. गाडगीळही यासाठी सहकार्य करू लागले. मग विचार सुरु झाला; प्रत्यक्ष सदस्य जोडणीसारख्या कामासाठी मुंबई पिंजून काढेल, ग्राहकांचा विश्वास संपादून त्यांना संस्थेत सामिल करून घेऊ शकेल अशा खंद्या सचिवाचा.

ही महत्त्वाची जबाबदारी पार पाडू शकेल असे एकच नाव सर्वांच्या डोळ्यासमोर येत होते ते म्हणजे मधुकरराव मंत्री. मधुकररावांचा व्यापक जनसंपर्क, साधेपणा, कष्टाळू वृत्ती आणि निरपेक्ष स्वभाव यांमुळे नवी संघटना उभारायला तेच सर्वार्थाने योग्य वाटत होते. अडचण एकच होती ती म्हणजे एक सुसंस्कृत राजकारणी अशीही त्यांची ओळख होती. त्यावेळी तर ते भारतीय जनसंघाचे मुंबईचे उपाध्यक्ष होते. मूळ विचार तर राजकीय पदाधिकारी नको असा होता. मग ठरलं की धाडस करून मधुकररावांना ते राजकारण सोडायला तयार आहेत का हे विचारावे. असं म्हणतात की राजकारण हेही एक व्यसनच आहे. एकदा लागले की सुटत नाही. साहजिकच मुंबईचे उपाध्यक्ष, पुन्हा जनप्रतिनिधी म्हणूनही लोकप्रिय ठरलेले मधुकरराव राजकारण सोडायला तयार होतील याची कोणालाच खात्री वाटत नव्हती.

मधुकररावांना अडचणीत टाकणारा हा प्रश्न विचारण्याची जबाबदारी संघटन मंत्री म्हणून माझ्यावर सोपविण्यात आली. थक्क व्हावं असे आयुष्यात जे मोजके अनुभव येतात त्यातला एक अनुभव मला आला. ''हे काम अगदी आवश्यक आहे आणि झालंच पाहिजे. समाजसेवेचे व्रत आपण स्वयंसेवक घेतो. समाजातील प्रत्येक व्यक्ती ग्राहक असतेच. ग्राहक संस्था उभी झालीच पाहीजे. त्यावर मी लक्ष केंद्रित करेन. यामध्ये पक्षीय राजकारण नको हे योग्यच आहे. मी जनसंघाचे काम थांबवतो आणि ही जबाबदारी घेतो'', असे अगदी सहजतेने मधुकररावांनी सांगितले. मी नतमस्तकच झालो.

'बोले तैसा चाले' असे हे मंत्री. मधुकररावांनी तात्काळ उपाध्यक्षपदाचा राजीनामा देऊन स्वतःला ग्राहक पंचायत उभारणीच्या कामात झोकून दिले. जनसंघाचा संघटन मंत्री म्हणून मुंबईच्या कानाकोपऱ्यात मीही हिंडत होतो. पण माझ्या दिमतीला निदान पक्षाने घेऊन दिलेली स्कूटर होती. मधुकररावही तसेच सर्वदूर हिंडत परंतु तेही बस आणि रेल्वेने. मधुकररावांना तेव्हा बहुतेक स्वप्नही ग्राहक संघ उभारणीचीच पडत असतील. संपूर्ण मुंबईत प्रत्येकी २५ कुटुंबं असलेले दहा हजार ग्राहक संघ तयार करायचे स्वप्न मधुकररावांनी पाहिलं आणि सातत्याने ते प्रत्यक्षात आणण्यासाठी ते कार्यरत राहिले. ग्राहक पंचायतीची स्थापना १९७५ च्या गुढीपाडव्याला झाली आणि पाठोपाठ जूनमध्ये देशात आणीबाणी जाहीर झाली. शेकडो संघ स्वयंसेवक, जनसंघ कार्यकर्त्यांची धरपकड झाली. वातावरण दुषित झाले. अशा बिकट परिस्थितीतही सुधीर फडके, पां. वा. गाडगीळ व मधुकरराव यांच्या निगराणीत ग्राहक पंचायतीचे रोपटे जोपासले गेले. आणीबाणीपूर्वीच निर्माण झालेली कृत्रिम टंचाई, भाववाढ यांनी आणीबाणीत अधिकच आक्राळ-विक्राळ स्वरूप धारण केले. त्यामुळे ग्राहक ऐक्याचे महत्त्व जनमानसात रुजविण्यास मदतच झाली. विपरित परिस्थितीतही संधी शोधून मधुकररावांनी सेवाकार्य वाढविले.

मध्यस्थांना टाळून जीवनावश्यक वस्तू थेट दारी येऊ लागल्या. दर्जेदार उत्पादनाबरोबरच सदस्यांना आगाऊ मागणी नोंदविल्यामुळे नियोजनाचीही सवय लागली. संघशक्तीचा परिचय होऊ लागला; प्रचिती येऊ लागली. मधुकरराव आणि ग्राहक पंचायतीच्या सर्वच संस्थापक मंडळींना संघटीत ग्राहक शक्ती अपेक्षित होती. त्यासाठीच तर १९८६ मध्ये ग्राहक संरक्षण कायदा बनण्यासाठीही पंचायतीने महत्त्वाचे योगदान दिले. वीज बील, टॅक्सी - रिक्षाचे मीटर असे अनेकानेक ग्राहकांच्या जिव्हाळ्याचे विषय यशस्वीरीत्या हाताळल्याने मुंबई ग्राहक पंचायत हा ग्राहकांचा आधारस्तंभ झाला.

मधुकररावांचा कामाचा झपाटा अतिशय वाखाणण्याजोगा होता. अशक्य ते शक्य करून दाखविण्याचे बाळकडू बहुदा मंत्री बंधूंना त्यांच्या मातोश्रींनी दिले असावे. मधुकरराव व रामभाऊ या दोघांनीही जुहुसारख्या ठिकाणी आपल्या संस्था उभारल्या. त्यासाठी शासनदरबारी योग्य पाठपुरावा करून जागा मिळविल्या. मधुकररावांची मुंबई ग्राहक पंचायत आणि समोरचीच रामभाऊंची विद्यानिधी आता खूपच मोठ्या, नावाजलेल्या संस्था म्हणून ओळखल्या जात आहेत. भारतीय जनता पार्टी केंद्रात, राज्यात, कुठेही सत्तेत नसताना ते हे करू शकले याचे एकमेव कारण म्हणजे कामाचा चोखपणा, चिकाटी आणि समोरचा आपल्या विचारांचा नसला तरी हाती घेतलेले काम राष्ट्रकार्य आहे हे पटवून देण्याची क्षमता. अन्यथा, श्री. सदाशिव

तिनईकरांसारखी व्यक्ती मुंबई महानगर पालिकेच्या आयुक्तपदी असताना ग्राहकभवन उभे राहिलेच नसते. माझे सद्भाग्य की ग्राहकभवन उभारणीच्या मधुकररावांच्या कामात मीही थोडा वाटा उचलू शकलो. या ग्राहक भवनात मधुकररावांनी इतरांनी सुचवूनही स्वतःसाठी छोटसं देखील दालन ठेवलं नाही. अनेकांना त्याचं मोठेच कौतुक वाटते. कारण एवढा निर्मोहीपणा क्वचितच पाहावयास मिळतो. पण मला वाटतं मधुकरराव ग्राहक पंचायतीच्या कामाशी अतिशय एकरूप झाले होते; सारे ग्राहक भवनच त्यांचे, त्यातली एखादी खोली ते कशी निवडणार? ते कोणत्याही रिकाम्या टेबलावर बसत आणि गदिमांनी प्रभूरामांबद्दल लिहिलेली काव्यपंक्ति 'शिळेस म्हणतील जन सिंहासन!' जणू सार्थ करीत! सगळ्यांच्यात सहज मिसळून साधेपणाने काम करण्याचा या स्वभावातच मधुकररावांच्या यशाचे गमक होते.

ग्राहकराजाच्या सेवेसाठी मधुकररावांनी अक्षरशः स्वतःला वाहून घेतलं होतं. अनेकदा मनात येतं की मधुकररावांना जनसंघाचे काम थांबवून ग्राहक पंचायतीचे काम करायचा आग्रह धरून आपण चूक तर केली नाही नां? मधुकररावांनी राजकारण सोडल्यावर दादर पश्चिमेवरील जनसंघाची पकड सैल झाली. ग्राहक चळवळीचे मधुकररावांमुळे भले झाले पण जनसंघाचे नुकसान झालेच. विशेषतः आणीबाणीत व नंतरच्या कालखंडात ते जनसंघात सक्रीय नसल्याची कमतरता चांगलीच जाणवली. असो! म्हणतात ना '...सर्वदेवनमस्कारं केशवं प्रति गच्छति!' (कोणत्याही देवाला नमस्कार केला, तरी तो श्रीकृष्णाला पोचतोच) राष्ट्रकार्य महत्त्वाचे!

मधुकररावांचे कार्य मोठे होते. मृत्युनंतर त्यांच्या अंत्यदर्शनाला लोटलेली अलोट गर्दी त्याचीच साक्ष देत होती. अंत्ययात्रेत सहभागी होऊन चालताना माझ्या लक्षात आले की सोबतीला अनेकानेक ज्येष्ठ संघ स्वयंसेवक, नेते, ग्राहक पंचायतीतील मातब्बर मंडळी आणि मधुकररावांची थोरवी अनुभवलेले अगणित लोकं आहेत. मुंबईतील ग्राहक चळवळीचे एका अर्थाने आद्य प्रणेते असलेल्या मधुकररावांचे चिरस्मरण राहावे यासाठी ग्राहक भवनाजवळच्या चौकाला त्यांचे नाव देण्यात आले. राजकीय जीवनात अनेक नामकरणे, अनावरणे मी केली आहेत. परंतु मधुकररावांचे नाव असलेल्या स्मृतिफलकाचे अनावरण करताना मला तो माझाच गौरव झाल्यासारखे वाटले. मधुकररावांना मनोमन मानवंदना देत मी नतमस्तक झालो. ♦

# एक मनमिळावू, प्रेरणादायी नेतृत्व

– **शशिकांत साळवी**, *कार्याध्यक्ष, गोरेगाव विभाग*

मी सांताक्रुझ पश्चिम येथे रहात असताना आमच्या घरी १९८० साली संघ निर्मितीची बैठक घेण्यात आली. त्यावेळी मधुकरराव आवर्जून आले होते. त्यांचा मनमिळावू स्वभाव आणि कार्यकर्त्यांना जोडण्याची शैली अजोड होती म्हणून त्या दिवसापासून माझा आणि त्यांचा संपर्क सतत वाढत गेला.

पुढे दिनांक २० जुलै १९८५ रोजी सांताक्रुझ विभागाची स्थापना करण्यात आली. त्या बैठकीला मधुकरराव, रजनीताई रांगणेकर, गोविलकर उभयंता आणि मृणालिनीताई देसाई असे ज्येष्ठ कार्यकर्ते हजर होते.

ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी आपले विचार मांडल्यावर, मधुकररावांनी सभेतील सभासदांनी आपले विचार मांडावेत असे सुचविले.

मी माझ्या वक्तव्यात म्हणालो संघ वाढ आणि सभासद वाढ करणे ही विभागाची जबाबदारी आहे. कारण त्यावेळेस ४६० ग्राहक संघ आणि ७५०० कुटुंबे सभासद होती.

विभागा-विभागामध्ये नेतृत्व निर्माण झाले पाहिजे. विभागीय कार्यकारिणी आणि सभासद तसेच केंद्रीय समिती यांच्यात सतत विचारांचे आदान-प्रदान व माहितीची देवाणघेवाण झाली पाहिजे.

या कार्याला समयदानाची गरज आहे. आपल्याला संघटीत प्रयत्नातून दबावगट निर्माण करावा लागेल. मधुकररावांनी मी मांडलेल्या या विचारांना दुजोरा दिला आणि मला कार्यवाह पदाची जबाबदारी घेण्यास सांगितले. पुढे मी या कामात इतका ओढला गेलो की, मुंबई ग्राहक पंचायत हा माझा ध्यास आणि श्वास झाला.

मधुकरराव विभागाच्या सुरुवातीपासून किमान पाच वर्षे प्रत्येक मासिक सभेला हजर राहून मार्गदर्शन करीत असत. आम्ही १९८५/८६ सालापासून दर वर्षी विभागाचा छापील अहवाल, जमा खर्चासह प्रत्येक सभासदाला देत असू. त्याविषयी ते म्हणाले 'आपण प्रामाणिक, सचोटीचे व सेवाभावी आहोत असे म्हणून चालत नाही. तर ते जमाखर्चाची मांडणी करून दाखविणे गरजेचे असते.' याच तत्वाने आजतागायत सर्व कार्यकर्ते काम करत आहेत. ♦

# पायाभरणी- संस्थेची व वास्तूचीही!

– **अशोक रावत,** *संस्थेचे संस्थापक सदस्य*

अत्यंत करारी चेहरा असला तरी चेहऱ्यावरचे स्मितहास्य मात्र समोरच्यावर छाप पाडल्याशिवाय राहात नसे, अशा व्यक्तिमत्त्वाचे मधुकरराव मंत्री यांना दादरकर मधु मंत्री या लाडक्या नावाने संबोधत असत. मला मधुकरराव आठवतात ते संघाच्या शाखेत जात असत तेव्हापासूनचे. त्यानंतर नगरसेवक म्हणून निवडून आल्यावर त्यांच्या कामाचा झपाटा वाढला आणि अनेक सामाजिक कामे त्यांनी मार्गी लावली. दीपक टाईल्स कारखाना सांभाळून ते राजकारण सांभाळत असत. त्यावेळेला जनसंघाचे चार नगरसेवक होते, त्या सर्वांचे ते नेता होते. त्यांच्या अनेक कामांपैकी, गृहनिर्माण सोसायट्यांना जागा मिळवून देणं हेही एक होतं. 'समृद्धी' या त्यांच्या राहत्या सोसायटीच्या जागेवर त्या आधी अनधिकृत झोपडपट्टी वसली होती. त्यांना हटवण्याची विनंती करत बिल्डर मधुकररावांकडे आले. त्यावेळी बिल्डरकडून त्या लोकांना बदल्यात योग्य तो मोबदला मिळेल व त्यांच्यावर अन्याय होणार नाही हे मधुकररावांनी पाहिले.

दादरला शिवाजी पार्क येथे रामलीला या सांस्कृतिक कार्यक्रमाला परवानगी मिळावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

१९७४ सालात दिवाळीमध्ये डालडा तुपाचा भरपूर साठा असल्याचा आणि ठराविक लोकांना त्याचे वितरण करत असल्याची माहिती मिळाली. मधुकररावांनी कार्यकर्त्यांकरवी तेथे पहारा ठेवून खात्री करून घेतली. फोन करून रेशनिंग कंट्रोलर व पोलीस कमिशनर यांना तेथे बोलावून घेतले आणि त्यांच्या समक्ष माल सर्वसामान्य ग्राहकांना विकण्यात आला व सर्व रक्कम दुकान मालकाला सुपूर्द केली. मधुकररावांनी ही कृती मुंबई ग्राहक पंचायतीकडे जाण्यासाठी पूरक ठरली.

१९७५ सालची आणीबाणी, त्यावेळेस जनसंघाचे महत्त्वाचे कार्यकर्ते भूमिगत झाले होते. मधुकररावांनी राजकारण सोडलं होतं. मुंबई ग्राहक पंचायतीच्या उभारणीचं काम सुरू झालं होतं. त्यासाठी ज्या बैठका होत असत तिथे गुप्त पोलीसांची उपस्थिती लागत असे. कारण आणीबाणीच्या परिस्थितीमुळे बैठकांचा रिपोर्ट त्यांना पोलीस स्टेशनला द्यावा लागे. गंमत म्हणजे मधुकररावच त्या पोलिसांना बैठकीचा रिपोर्ट लिहिण्यास मदत करत.

मुंबई ग्राहक पंचायत संस्थेच्या वास्तूसाठी जागा मिळावी या विचारातही ते होतेच. जुहू म्युनिसिपल मार्केटच्या मागे संस्थेला गोडाऊन भाड्याने मिळालं होतं, त्याच्या आसपासची जागा मोकळी होती. ती जागा मिळेल असं वाटू लागलं. त्यावेळी निवडून आलेली महानगरपालिका काही तांत्रिक कारणांमुळे बरखास्त झाली होती. निवडून आलेले नगरसेवक कार्यरत नव्हते. अशावेळी महानगरपालिकेचे आयुक्त श्री. द.म. सुखटणकर, यांची नेमणूक शासनाने प्रशासक म्हणून केली होती व नगरसेवकांच्या जबाबदाऱ्या प्रशासक म्हणून त्यांच्यावर आल्या. त्यावेळी मुंबई ग्राहक पंचायतीच्या जागेचा प्रश्न घेऊन मधुकरराव त्यांच्याकडे गेले. ग्राहक हिताचे हे चांगले काम पाहून सुखटणकरांनी वास्तू उभी करायला ५००० स्क्वेअर फीट जागेसाठी मान्यता दिली. पुढे सगळं सुरळीत सुरू झाल्यावर श्री. सदाशिव तिनईकर आयुक्त पदावर आले. त्यांच्या सहकार्याने हा मुद्दा पुढे सरकला. त्यांच्याच हस्ते इमारतीची पायाभरणी करण्यात आली आणि 'ग्राहक भवन' ही वास्तू उभी राहिली.




**शब्दांकन – रंजना मंत्री**

# अखंड आनंदाची देव-घेव

**– मीना केशकामत,** *माजी कार्यवाह*

**म**धुकरराव कुशल संघटक होते. ग्राहक हितासाठी कसे वागावे हे त्यांनी आपल्या वागणुकीतून शिकविले. नेता जे जे आचरण करतो त्याप्रमाणेच इतर कार्यकर्ते अनुसरण करतात. तो जे काही प्रमाण म्हणून सांगतो त्याप्रमाणेच त्याच्या आजूबाजूचा मनुष्य समुदाय वागू लागतो. मधुकरराव व त्यांचे सर्व विचारी सहकारी या पद्धतीने काम करीत राहिले. या गोष्टींचा कार्यकर्त्यांवर संस्कार होई. या प्रभावातून, संस्कारातून तो कार्यकर्ता त्यांच्यासारखे काम करण्याचा प्रयत्न करी.




**लोकसत्ताचे ज्येष्ठ पत्रकार सुभाष सोनावणे यांच्यासह**

घराघरात ग्राहक चळवळ पोहोचवण्याचे उद्दिष्ट बाळगून ग्राहक संघ ही संकल्पना अंमलात आली. ग्राहक संघ निर्मितीचे हे काम मधुकररावांनी निष्ठेने केले. ग्राहक संघ स्थापनेपूर्वीच्या बैठकीत ते वस्तूंची खरेदी, वाटप, वितरण, मागणीपत्रकातील तारखांची शिस्त, बिलाची रक्कम देण्याची जबाबदारी, कुटुंबाचे हित आणि संरक्षण अशा गोष्टी सविस्तर सांगत आणि अखेरीला आपली आवड, सवड यांची सांगड घालून एखाद्या कामाची निवड करून चळवळीच्या कार्यात सहभागी होण्याचे आवाहन करीत. एखाद्या धर्मप्रसारकाप्रमाणे सौम्य भाषेत आणि आवाजात हे विवेचन असे. सर्वांबरोबर कॉफी घेत. या निमित्ताने सभासदांशी थेट संबंध जोडला जाई. एकदा झालेली ओळख ते कधी विसरत नसत. या धाग्याने पुढे त्या सभासदांचा कार्यकर्ता घडण्याची प्रक्रिया सुरू होई. कार्यकर्ता होण्याची क्षमता असलेल्या सभासदांना फोन करणे, प्रत्यक्ष घरी जाऊन भेटणे, ग्राहक भवनला येण्यासाठी आग्रह करत राहणे, अशा गोष्टी मान–अपमानाची खंत न बाळगता ते करीत रहात.

ग्राहक पंचायतीचा सुरुवातीचा काळ होता. ग्राहक भवन उभारलं होतं. सर्वांचं स्वागत करायला मधुकरराव तिथे हसतमुखाने विराजमान झालेले असायचे. निरनिराळे उपक्रम, प्रशिक्षण शिबिरे, निरनिराळ्या विभागांच्या बैठका, सभा यांनी ग्राहक भवन गजबजून जाई. कार्यकर्त्यांचे मोहोळ उठलेले असे. कार्यकर्ता हे संघटनेचं बळ असतं आणि प्रशिक्षित कार्यकर्ता हे संघटनेचे धन असतं– या भावनेने कार्यकर्ते भारावलेले असत. या सर्व कार्यकर्त्यांचे जनकत्व बहुधा मधुकरावांकडेच असायचे.

सकारात्मक दृष्टीकोन बाळगून मुंबई ग्राहक पंचायतीची पुढील वाटचाल सुरू झाली. महिलांच्या लक्षणीय सहभागाची जोड या कामाला लाभली. बाजारपेठातून थेट कुटुंबापर्यंत येणाऱ्या, रास्त किंमत,योग्य वजनमाप आणि दर्जेदार वस्तूंच्या मासिक वाटपामुळे ग्राहक संघ वाढीच्या कामात सुरुवातीला महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या.

वाढती ग्राहक संख्या, स्वेच्छेने व स्वयंसेवी पद्धतीने कामात सहभागी होणारे कार्यकर्ते इ. विचार होऊन मुंबई ग्राहक पंचायतीच्या कार्यपद्धतीची रचना करण्याचे काम सुरू झाले.

भौगोलिक समित्या, ग्राहक शिक्षण, संघटन, संरक्षण आणि ग्राहक समस्यांचा अभ्यास व संशोधन अशा कार्यकारी समितींची रचना तयार झाली. मुंबई ग्राहक पंचायतीच्या व्यासपीठावर काम करण्याची संधी प्राप्त करून देण्याचा प्रयत्न संघटनेने याद्वारे साध्य केला.

मोठेपणा, हेवेदावे या शब्दांना त्या वातावरणात मुंबई ग्राहक पंचायतीमध्ये स्थान नव्हते. आपल्या इच्छेने काम करावे, आनंद घ्यावा, समृद्ध व्हावे, समाधानी व्हावे, असा तो काळ होता. ♦

# आशावादी व जिद्दी

**– कमळाकर पेंडसे,** *माजी कार्यवाह*

**वि**धायक कामात कार्यकर्त्यांना खेचून आणण्यासाठी जिद्दी असणं याचं उत्तम उदाहरण म्हणजे श्री. मधुकरराव मंत्री. मधुकररावांच्या या जन्मशताब्दी वर्षात त्यांचं स्मरण करताना त्यांच्या स्वभावातले अनेक पैलू आठवत जातात. मुंबई ग्राहक पंचायत या संस्थेत माझा प्रवेश होण्यास मधुकररावांची जिद्द व चिकाटी यांचा सिंहाचा वाटा आहे, हे मला या येथे आवर्जून सांगावेसे वाटते. संस्थेच्या कामात मी कशाप्रकारे योगदान देऊ शकतो, हा प्रश्न मी introvert असल्याने मला नेहमीच पडत असे आणि त्या-त्या वेळेस 'तू खूप काही करू शकतोस' असे आश्वासक उत्तर मधुकररावांचे असे.

एकदा RCF ने आपल्या कर्मचाऱ्यांकरिता एक जंगी जुलूस आयोजित केला होता. त्यातील एक स्टॉल मुंबई ग्राहक पंचायतीला देण्यात आला. स्टॉलला भेट देण्याकरता RCFचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. दिलीप सिंह हे येणार होते. संस्थेतर्फे मधुकररावांना बोलवायचे ठरले. मधुकरराव आले... आणि काय... 'वह आ गये और छा गये' असेच सर्वांना वाटले. कारण, त्यांचे व्यक्तिमत्त्व जेवढे आकर्षक होते, तसेच त्यांचे बोलणेही तेवढेच प्रभावी होते.

त्यावेळेस दादरला बालमोहन शाळेत संघ सभासदांच्या अडचणी, सूचना ऐकून घेण्यासाठी संघ प्रमुखांच्या मासिक बैठका घेतल्या जात. यावेळी RCF मधील सभासदांच्या वतीने या बैठकांना हजर राहण्याची जबाबदारी माझ्यावर आली. या इथे मधुकररावांची भेट व सहवास मिळत होता. मला संस्थेत आणण्याचे त्यांचे प्रयत्न चालू होतेच. हळूहळू माझ्यावर प्रभाव पडू लागला व या 'ग्राहक हिताय ग्राहक सुखाय' कार्यासाठी आपण वेळ द्यावा असे मी निश्चित केले.

१९८५ सालात, मी कार्यवाह पदावर असताना माझ्या कल्पनेतून कार्यकर्त्यांच्या कामाच्या सुलभीकरणासाठी व कामाच्या विकेंद्रीकरणासाठी संस्थेचे भौगोलिक विभाग सुरू करण्यात यावेत असे मी सुचवले. कार्यकारिणीत हा माझा विचार एकमताने उचलून धरला गेला आणि विभागांच्या रचनात्मकतेचे काम मी आनंदाने स्वीकारले. मधुकररावांनी माझ्यावर टाकलेला विश्वास काही अंशी का असेना पूर्ण झाला याचे मला समाधान आहे.

प्रतिभाताई गोडबोले यांच्या कल्पनेतून १९७८ सालापासून पंचायत पेठांचा उपक्रम सुरू झाला. काही दिवसांकरिता चालणाऱ्या या पेठांमध्ये संध्याकाळी कार्यकर्ते चर्चा करण्यासाठी जमत असत. किती ग्राहक संघ स्थापन करावे लागतील? हया चर्चेत उपस्थित झालेल्या प्रश्नावर, मधुकरराव आश्वासकतेने म्हणत, दहा हजार (२५ कुटुंबाचा एक संघ) संघ स्थापन झाले तरच आपण मार्केटमध्ये ठामपणे उभे राहू शकणार. त्यांच्या बोलण्यात नेहमी असा आशावाद व काम तडीस नेण्याची जिद्द दिसून येई आणि त्याचा प्रभाव समोरच्यावर पडत असे.

तेव्हाच्या खरेदी समिती अध्यक्षा श्रीम. वसुधा चाचड या त्यांच्या ओळखीत म्युनिसिपल कॉर्पोरेशनची जागा ठाणे गोडाऊनकरिता मिळवण्याच्या प्रयत्नात होत्या. परंतू ते काम काही पुढे जात नव्हते. मधुकररावांच्या हे लक्षात आले आणि त्यांना घेऊन ते तेव्हाच्या उपमहापौरांना भेटायला गेले. काम लगेच फत्ते झाले. केवढा विश्वास संपादन केला होता मधुकररावांनी, त्यांच्या शब्दाला जाईल तेथे मान मिळत होता.

अजून एक बोलकं उदाहरण म्हणजे, संस्थेचा विस्तार होत असताना तेव्हाचे म्युनिसिपल कमिशनर श्री. सदाशिवराव तिनईकर यांच्या हस्ते १९८७ साली जागतिक ग्राहक हक्क दिन १५ मार्च या दिवशी ग्राहक भवन या वास्तूसाठीचे भूमीपुजन झाले. तिनईकरसारख्या, नीती मूल्य जपणाऱ्या व्यक्तीने मधुकररावांवर विश्वास ठेऊन पाच हजार स्क्वेअर फूट जागा वास्तु उभारण्यासाठी उपलब्ध करून दिली ही बाबच मधुकररावांबद्दल खूप काही सांगून जाते. १९८८ साली ग्राहक भवन वास्तूचे उद्घाटन भारताचे माजी सरन्यायाधीश श्री. यशवंतराव विष्णु चंद्रचूड यांच्या हस्ते झाले.

मधुकररावांबद्दल अजून एक सांगण्यासारखे म्हणजे ते अजातशत्रू होते. त्यांचे निरनिराळ्या राजकीय विचारसरणींच्या लोकांशी, पुढाऱ्यांशी उत्तम जुळत असे. या गोष्टीचे प्रतिबिंब संस्थेसाठी कार्यकर्ते गोळा करताना दिसून येत होते. श्रद्धेने काम करतांना कार्यकर्त्यांमध्ये मधुकरराव रमत असत.

मुंबई ग्राहक पंचायतीचे प्रणेते, मधुकरराव वयामुळे थकत चालले होते, तरीही शरीराने साथ देईपर्यंत नियमित ग्राहक भवनात ते जात असत, जसा एखादा भक्त मंदिरात जात असतो, कारण ग्राहक भवन हे त्यांच्यासाठी मंदीर होतं.

**शब्दांकन – रंजना मंत्री**

# उत्साही आणि संयमी

– ललिता कुलकर्णी,
विश्वस्त, मुंबई ग्राहक पंचायत

१९७५ च्या सुमारास बाजारात डालडा वनस्पतीचा तुटवडा असताना काळ्या बाजाराने विकल्या जाणाऱ्या तुपाच्या डब्यांचे पोलीस संरक्षणखाली त्यांनी ग्राहकांना कसे शिस्तीत वितरण केले, इतकेच नव्हे तर व्यापाऱ्याला मालाची रास्त किंमतही पोहोचवली या व अशा उपक्रमांची गाथा मी ऐकली होती. त्यामुळे मधुकरराव मंत्री यांच्याबद्दलची एक 'हीरो'ची प्रतिमा माझ्या मनात निर्माण झाली होती. प्रत्यक्ष व्यवहारात त्यांचे व्यक्तिमत्व मला खूपच सौम्य व सौहार्दाचे किंबहुना unassuming वाटले. मधुकर वृत्तीने त्यांनी संघटनेसाठी अनेक कार्यकर्ते जोडले आणि आपल्या सौजन्यशील वागण्याने ते टिकवलेही. मुंबई ग्राहक पंचायत हे आपले विस्तारित कुटुंब आहे ही भावना त्यांच्या मनात होती. त्यामुळेच एकदा त्यांच्या पत्नीने लटक्या रागाने, 'मीटिंगपायी रात्री वेळेवर जेवायला घरी आला नाहीत तर जेवायला वाढणार नाही', अशी धमकी दिली असता, 'माझ्या एकेक सभासदाच्या घरी रोज जेवलो तर माझ्या वर्षाच्या जेवणाची सोय होईल' असे त्यांनी खिलाडीवृत्तीने उत्तर दिल्याचेही ऐकिवात आहे.

त्यांचा पिंड नेत्यापेक्षा कार्यकर्त्याचा अधिक होता. नवीन ग्राहक संघ स्थापन करण्यासाठी बैठक घेण्यासाठी दिवसा, रात्री केव्हाही व कोठेही जाण्यास ते तयार असत.

रात्रीच्या बैठकीला टीव्हीवरील लोकप्रिय मालिकेमुळे लोक वेळेवर जमले नाहीत तरी शांतपणे ते वाट पहात. क्वचित उपस्थिती कमी असली तरी नाराज न होता ते तितक्याच उत्साहाने बैठक घेत इतकेच नव्हे तर 'बैठक छान झाली; संघ नक्की होणार' असे म्हणून बरोबरच्या कार्यकर्त्यांनाही उमेद देत.

ग्राहक भवनमध्ये त्यांची नियमित उपस्थिती असे. हॉलमध्ये मोकळ्यावरच त्यांचे टेबल असे. तेथे येणाऱ्या जुन्यानव्या कार्यकर्त्यांचे ते हसतमुखाने स्वागत करून मोकळेपणाने त्यांच्याशी बोलत. त्यामुळे त्यांच्यासाठी स्वतंत्र केबिन तयार करण्याचा प्रस्ताव त्यांनी सरळ अमान्य केला! नवीन कार्यकर्त्यांना ते प्रोत्साहित करत. त्यामुळे कार्यकर्त्यांनाही नवनवीन जबाबदाऱ्या घेण्यासाठी आत्मविश्वास मिळे. मी कार्यवाह असतांना संस्थेच्या हितासाठी त्यांना अप्रिय वाटतील असे काही निर्णय कार्यकारिणीने घेतले. त्याबद्दल आपली नापसंती स्पष्टपणे पण सौम्य शब्दात त्यांनी माझ्याकडे व्यक्त केली. पण त्या कारणाने माझ्यासह कोणाबद्दलही त्यांनी मनात किंतु ठेवला नाही हे त्यांचे 'अजातशत्रुत्व' माझ्या मनात ठसले. मुंबई ग्राहक पंचायत ही 'ग्रासरूट' संघटना आहे, याचा त्यांना रास्त अभिमान होता. आणि ते स्वरूप देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता हे निश्चित! त्यांच्या जन्मशताब्दी निमित्त माझी त्यांना विनम्र शब्दांजली. ♦



ललिता कुलकर्णी व मधु मंत्री

# स्मृतिरंजन



आई (मातोश्री) – सुमित्रा दत्तात्रय मंत्री



मधुकर मंत्री, सुमित्रा मंत्री, श्रीराम मंत्री (बंधू)




अखिल भारतीय ग्राहक पंचायत पहिली ओळ बसलेले,
मधोमध– बिंदुमाधव जोशी, त्यांच्या उजवीकडे सुधीर फडके व मधुकर मंत्री



पत्नी – शोभनासह



मुंबई ग्राहक पंचायतीच्या कार्यकर्त्यांच्या गोतावळ्यात



मधुकरराव व केंद्रिय मंत्री जयवंतीबेन मेहता
आपल्या जोडीदारांसमवेत



नगरपिता निवडणुकीत विजयी...
महापौर माधवराव कुंटे सत्कार करताना



महापौर (१९७१) डॉ. हेमचंद्र गुप्ते यांच्यासह



महापौर (१९८२) डॉ. प्रभाकर पै सत्कार करताना



सत्तराव्या वाढदिवसानिमित्त गिरगाव विभागातर्फे आयोजित सोहळा




ललिता कुळकर्णी, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश कुलकर्णी, प्रा. गंगाधर गाडगीळ, मधुकरराव मंत्री व वनमाला मंजुरे पुस्तिका प्रकाशन सोहळा



समकालीन कार्यकर्त्यांसमवेत मधुकरराव



महापौर एस आर पाटकर यांच्यासमवेत




षष्ठ्यब्दी सोहळ्यात श्री.सुधीर फडके




षष्ठ्यब्दिनिमित्त सत्कार सोहळ्यात बोलताना... संस्थापक सदस्य श्री. सुधीर फडके

# सत्शील व समाजशील

– रंजना मंत्री
*कार्यवाह – दादर–माहिम–बांद्रा विभाग, स्नुषा*

**स**काळी कितीही लवकर उठलं, तरी आमच्या घरात एक दृश्य कायम नजरेस पडे, जे मी माझ्या लग्नानंतर बरीच वर्षे बघत आले होते आणि माझ्या मनावर कोरले गेले, ते म्हणजे बापू, माझे सासरे, मधुकर मंत्री, हे हॉलच्या गॅलरीत त्यांच्या खास खुर्चीवर बसून गॅलरीच्या खिडकीचा पडदा थोडासा बाजूला सारून त्या उजेडात वर्तमानपत्र वाचत बसले आहेत. यात दोन गोष्टी लक्षात येत होत्या, त्या कोणत्या? तर, पहाटेचा तो बाहेरचा अंधुक उजेड वर्तमानपत्रातील बारीक अक्षर वाचण्यास त्यांना पुरेसा होता. म्हणजे दृष्टी साफ होती. दुसरं, विजेचा दिवा लावणं टाळलं होतं, म्हणजे विजेची बचत व हॉलमध्ये झोपलेल्या मुलाबाळांना त्यांच्या पहाटेच्या साखरझोपेत दिव्यामुळे व्यत्यय येऊ नये याची काळजी घेणे.




**मुंबई ग्राहक पंचायतीच्या जुहू–विलेपार्ले येथील ग्राहक भवनचे उद्‌घाटन माजी सरन्यायाधीश यशवंतराव चंद्रचूड यांनी केले. चंद्रचूड भाषण करतानाच्या छायाचित्रात (डावीकडून) मधुकरराव मंत्री, सौ. चंद्रचूड, प्रा. गंगाधर गाडगीळ, सुधीर फडके व एम.आर.पै.**

अजूनही एक दृश्य नजरेस पडत असे... आमच्या आज्जी, बापूंची आई, लेकाची चाहूल लागताच लगबगीने उठून, घरातील दुसरं कुणी करेल की नाही याची वाट न बघता, गॅसवर दूध गरम करून त्यातील दुरदुरीत साईसकट त्यांच्या स्पेशल मोठाल्या कपामध्ये घालून व सोबत कच्च अंडं असं त्यांच्यासमोर ठेवत असत. स्वतःची काळजी घेण्याच्या वयातही त्या बापूंची काळजी घेत असत. लहानपणापासूनच सुदृढ व सुसंस्कृत बनवलं होतं त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना.

बापूही कुटुंबासाठी असेच होते. सगळ्यांचा विचार करणारे, मनमिळाऊ, आनंदी, प्रसन्न व कायम हसतमुख. पण हो, त्यांच्या योजलेल्या कामात काही व्यत्यय आला तर मात्र त्यांची चिडचिड होत असे, पण तेवढ्यापुरतीच. मग सगळं परत नॉर्मल. त्यांच्या व्यावसायिक कामापेक्षा सामाजिक कामासाठी त्यांना जास्त वेळ द्यावा लागत असे.

त्यांच्या डायरीत कायम पुढील दोन ते तीन महिन्यांच्या तारखांची नोंद केलेली असे. सिमेंट असोसिएशन, जनसंघ, शाखा, मुंबई ग्राहक पंचायत आणि बरंच काही. या सगळ्या क्षेत्रातील लोक त्यांना कामानिमित्ताने भेटायला घरीही येत असत. या प्रत्येकाशी बापू तेवढ्याच अदबीने बोलत. त्यांना पूर्ण वेळ देऊन त्यांना आपल्या सल्ल्याची कशी मदत होईल हे ते बघत असत. कधी कधी तर सकाळच्या वेळी मंत्री हमखास भेटतील या अंदाजाने काहीजण भेटायला येत असत. परंतु ते कधीच त्यांच्यावर नाराज होताना मी पाहिलं नाही. उलट काहीवेळा दाढी करत असतील आणि अचानक कुणी आलं तर ते अर्धवट केलेल्या दाढीच्या फेस नॅपकीनने पुसून त्यांच्याशी बोलायला जात. आलेल्या प्रत्येकासाठी त्यांचा चहा कॉफीचा आग्रह मात्र असायचाच. बापू नेहेमी कॉफी पीत असत. चहा कधीच नाही. एकदा ग्राहक संघ स्थापनेला गेले असताना त्यांची कॉफीची आवड माहीत नसल्यामुळे त्यांच्यासमोर चहा आला व 'नाही म्हणू नका घ्याच', असा आग्रह झाला. समोरच्या व्यक्तीचं मन मोडू नये यासाठी बापू आवडत नसतानाही चहा प्यायले होते.

बापू कामासाठी बाहेर निघाले की घरी येण्याची त्यांची वेळ मात्र निश्चित नसे. कारण त्यांच्या डायरीत नोंदवलेल्या कामाव्यतिरिक्त काही कामं त्यांची वाट पाहात वाटेत उभी असायची आणि मग त्यातून एखादं मोठं कार्य निर्माण व्हायला सुरुवात व्हायची. बापू एवढे व्यस्त असूनही कधी कोणत्याही कामाला जाताना घाई झाली, उशीर झाला म्हणून टॅक्सीने गेले, असं कधीच झालेलं नाही. नेहमी सार्वजनिक वाहने वापरत. घर ते रेल्वे स्टेशन हे अंतर कायम पायी जात. इतरांसाठी जे लांबचं अंतर ते त्यांच्यासाठी आटोक्यात असे आणि त्यासाठी ते त्यांच्या पायाची गाडी वापरत. 'माझी आपली अकरा नंबरची बस' असं ते म्हणत. आपल्या पायातील बळावर त्यांचा पूर्ण विश्वास होता आणि याच विश्वासावर ते आयुष्यातही येणाऱ्या अनेक संकटांना सामोरे जात आपली वाटचाल करत राहिले. ♦

# सक्षम नगरपिता

– संजीव मंत्री
*अध्यक्ष अंधेरी–जोगेश्वरी विभाग, (पुतण्या)*

**म**धुकर.... १९२४ साली नियतीने निर्घृण घाला घालून अभागी ठरविलेल्या १८ वर्षीय सुमित्रेचा २ वर्ष वयाचा थोरला मुलगा.

'म्हशीची शिंगा म्हशीक कधीच जड नसतत...' असं म्हणत सुमित्रेला मधुकर व श्रीरामसह जवळ करणारं संस्कारी माहेर नक्कीच कोवळ्या मधुच्या मनावर खोलवर संस्कार करून गेलं असावं. याच मधूने पुढे आयुष्यभर अनेकांना वात्सल्याने मदतीचा हात देत भरारी मारायला शिकवलं.

मधुकरराव म्हणजेच आमचे बापू. मला आमच्या बापूंचा प्रसन्न, शांत पण खंबीर चेहरा डोळ्यासमोर येतो. मला वाटतं शांत चित्ताने खंबीर निर्णय घेण्याचं बाळकडू त्यांना त्यांच्या आईने दिलं होतं. शून्यातून संघर्ष करत शिक्षण घेतलं. भाऊ श्रीराम यालाही जीवापाड जपलं व जोपासलं. अखेरपर्यंत दृष्ट लागावं असं दोघा भावांचं पारदर्शी व भावनिक नातं राहिलं.

बापू बालपणी क्रिकेटमध्ये उत्कृष्ट गोलंदाजी करत. बापूंची इंग्रजी अद्याक्षरं एम्. डी. त्या काळात जर्मनीची युध्दनौका एमडन तोफा डागून शतूपक्षाला उद्ध्वस्त करत होती. त्यामुळे बापू गोलंदाजीला आले की 'एमडन आयलो रे' ची हाळी वेंगुर्ल्याच्या मैदानात उमटत असे.

बालपणातील संघर्षमय जीवनात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत जाणं सुरू झालं. म्हणजेच त्यावेळचा प्रवाहाविरुध्दचा प्रवास. पण संघावरचा विश्वास एवढा दृढ की स्वतःच्या विशीत १९४७च्या संघबंदीविरुध्दच्या सत्याग्रहात बेधडक उडी घेऊन तुरुंगवास पत्करला. राष्ट्र व स्वतःचा परिवार यात राष्ट्राला प्राधान्य देणारे आमचे बापू... त्यांचं हे सत्याग्रहाचं वर्णन आमच्या आजींच्याच तोंडून मी ऐकलं आहे.

प्रबोधनकार ठाकरेंच्या अध्यक्षतेखाली शिवाजी पार्कवरचा जो छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा दिसतोय ना, तो उभारण्यासाठी एक समिती स्थापन केली गेली होती. संघटन कुशल मधुकररावांनी कार्यवाह म्हणून याची जबाबदारी यशस्वीरित्या पेलली... काम पूर्ण केलं. पण त्याविषयी मी मी म्हणून मिरवताना त्यांना कोणी कधीही पाहिलं नसेल.

माझ्या बालपणात मनावर कोरले गेलेले बापू म्हणजे नगरपिता बापू. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत निवडून येणाऱ्या जनसंघाच्या पहिल्याच बॅचचे गटनेते बापूच होते. दादर विभागातील असंख्य वस्त्यांमध्ये अहोरात्र काम करणारे व सतत जनतेत मिसळून काम करणारे बापू आपोआपच मनात कोरले गेले. महाकाय काँग्रेससमोर मुंबईत जनसंघाचे संघटन उभे करणाऱ्या चमूतील बापूंचं योगदान मोठं होतं. मुंबई जनसंघाच्या उपाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या बापूंकडे अटलबिहारी वाजपेयी, नानाजी देशमुख, जगन्नाथराव जोशी यांचा मुंबईतील वास्तव्यात निवास असायचा. पण याचा गवगवा व मार्केटींग बापूंनी किंवा कुटुंबियांनी कधीही केलं नाही व वैयक्तिक स्वार्थ साधला नाही. आजच्या जमान्यात ही अतिशय दुर्लभ गोष्ट आहे.

अचंबित करणारा धाडसी निर्णय त्यांनी १९७५ साली घेतला. तो म्हणजे राजकारण सोडून समाजकारण करण्याचा. मा. सुधीर फडकेंची व बापूंची घनिष्ठ मैत्री. मा. सुधीर फडकेंच्या अध्यक्षतेखाली मुंबईत ग्राहक पंचायतीची स्थापना करून सर्वात महत्त्वाची अशी संघटना बांधणीची जबाबदारी बापूंनी पूर्णपणे अंगावर घेतली व तडीला नेली. आज आशियातील सर्वात मोठ्या अशा ह्या मुंबई ग्राहक पंचायतीचा कणा म्हणजे संघटनेची वैशिष्ठ्यपूर्ण चौकट आहे.

कोणत्याही उच्चपदस्थ व्यक्तिला बेधडक भेटून त्याच्याकडे पारदर्शी चर्चा करून त्याची मैत्री संपादन करणं यात बापूंचा हातखंडा होता. तिनईकरांसारखा कडक शिस्तीचा प्रशासक बापूंचा शब्द पडू देत नसे.

मी खरंच खूप भाग्यवान. बाबांनी माझा थोरला भाऊ प्रदीप व माझी मुंज एकत्र करायचं ठरवलं. त्यामुळे प्रदीपची मुंज आई बाबांनी व माझी मुंज काकी बापूंनी लावली. यामुळेच की काय नकळत पुढे माझाही कल काही काळ राजकारणाकडे व आजपर्यंत समाजकारणाकडे वळला. ही बापूंचीच दीक्षा असावी.

बापूंच्या सामाजिक दृष्टीकोनाच्या पाऊलवाटेवरून आम्ही संपूर्ण मंत्री कुटुंबीय वाटचाल करतच असतो याचं त्यांना स्वर्गामध्ये नक्कीच समाधान मिळत असेल.

♦

# आमचे बापू - उत्तुंग व्यक्तिमत्त्व

**– मीना विजय कामत**, *ज्येष्ठ कन्या*

**ती.** बापूंचा जन्म कोकणातील वेंगुर्ल्याचा! २ वर्षांचे असताना वडील निवर्तले, आईने ह्या दोन भावांचं लालनपालन कठीण परिस्थितीत अतिशय धीराने केलं आणि मुलांना बाहेरच्या जगात सक्षमपणे वावरण्याचं बळ दिलं.

शालेय शिक्षणाबरोबर कसरत, विहीरीत पोहण्यात दोघे तरबेज झाले. याच दरम्यान त्यांची राष्ट्रीय स्वयंसेवक संघांची ओळख झाली. दोघं भाऊ सकाळी शाखेत जाऊ लागले. संघाची शिस्त देशाचा अभिमान आणि सुदृढ शरीरयष्टी याची शिदोरी घेऊन पुढील आयुष्याची वाटचाल सुरू झाली. कँपात खेळून क्रिकेटची आवड निर्माण झाली होतीच.



मॅट्रिकच्या परिक्षेसाठी ११वीतच मुंबई गाठली. काका सर्वश्री के.टी.मंत्री हे मोठे शिक्षणाधिकारी होते. त्यांच्याकडे हिंदू कॉलनीत राहू लागले. मुलांनी भरलेल्या कुटुंबात एकरूप झाले.

मुळात स्वभावातच दूरदृष्टी होती. स्वतः मॅट्रीक झाल्यावर त्यांना काकांना मुंबईला आणायचं होतं. त्याच गल्लीच्या दुसऱ्या टोकाला एक खोली भाड्याने घेतली. आता आजींना आणायचा विचार सुरू झाला आणि वर्षभरातच दादर स्टेशनजवळ जिवादेवशी निवास येथे दोन खोल्यांची जागा घेतली आणि त्यांची आईही मुंबईत आली. ही जागा पुढे आयुष्यातल्या सर्व यशाची साक्षीदार ठरली.

आमची आई कराचीत स्थाईक असलेल्या श्रीमंत, मोठ्या व्यापाऱ्यांची मुलगी. तडफदार आणि विचारी. लग्नानंतर घरात मिसळून गेली. एका मोठ्या कुटुंबातून येऊन छोट्याशा कुटुंबात एकरूप झाली. १९४७ मधे फाळणीनंतर राजकीय धरपकड झाली. त्यात बापू, काका दोघांनाही तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगातून बाहेर आल्यानंतर बापूंनी त्यांचं राहून गेलेलं शिक्षण करायचा निर्धार केला. स्टेनोग्राफरचं शिक्षण घेऊन त्यात ते तरबेज झाले होतेच. सकाळी आणि संध्याकाळी दोन नोकऱ्या करून दिवसा कॉलेज करायची जिद्द होती त्यामुळे बी.ए. झाले आणि पुढे कायद्याचा अभ्यास सुरू केला. एल्.एल्.बी. झाले. शिक्षणाची ओढ होतीच. डी.एल्.डब्ल्यू करून लेबर वेल्फेअर ऑफिसर झाले. शिक्षणादरम्यान ते सकाळी युनिव्हर्सिटीत काम करायचे आणि संध्याकाळी मोटीबेन नावाच्या वयस्कर बाईंना कामात मदत करायचे. मोटीबेनने त्यांच्या कामाचा आवाका, सचोटी, मेहनत पाहिली होती. बापू चहा घेत नसत पण मोटीबेनचा मसाला चहा अधूनमधून घ्यायचे. मोटीबेनने त्यांच्या निमको टाइल्समधे बापूंची शिफारस केली आणि ती त्यांची पहिली पूर्णवेळ नोकरी सुरू झाली. संसार मार्गी लागला. आम्ही चौघं भावंडं वाढत होतो. बापूंचं उच्च शिक्षण झालं होतं. त्यांच्या आकांक्षा त्यांना स्वस्थ बसू देत नव्हत्या. घरची संपूर्ण जबाबदारी आईने सहजपणे पेलली होती. त्यांना स्वतःची इंडस्ट्री असावी ही सुप्त इच्छा होती. निमकोमधले हाथीभाई यांनी ते जाणलं होतं त्यांनी खतपाणी घातलं आणि चक्र हलू लागली.

यामधल्या सगळ्या वर्षात संघाच्या कामाचा पसाराही बऱ्यापैकी वाढला होता. १९५१ च्या दरम्यान संघाने जनसंघ या नावाने राजकीय पक्षाची घोषणा केली निशाणी दीपक! त्यानुसार कार्यकर्त्यांची कामात गती आली. १९६१ची निवडणूक लढवण्याची घोषणा झाली आणि उमेदवार म्हणून बापूंचं नाव घोषित झाले. माझं हे मॅट्रिकचं वर्ष होतं पण त्याच वातावरणात माझा अभ्यास व्हायचा. घरात सभा व्हायच्या. बापूंच्या आयुष्यातलं हे सुवर्णपान म्हणता येईल. बापू दादर–माहिममधून निवडणूक जिंकले. दिपूचा जन्म झाला आणि मीही चांगल्या मार्कांनी मॅट्रिक झाले. जल्लोष झाला आमची बिल्डिंग हितचिंतकांनी फुलली होती. नवीन जन्मलेल्या बाळाचं नाव दीपक ठेवलं (जनसंघाची निशाणी) आनंदी आनंद झाला. जनसंघाचे प्रथमच ४ उमेदवार निवडून आले होते. बापूंना समाजात एक प्रतिष्ठा प्राप्त झाली.

त्याच दरम्यान त्यांच्या नवीन कंपनीचा उगम झाला

नाव दीपक टाईल्स ॲण्ड इंडस्ट्रीज ठेवले. या काळात आमच्याकडे एक 'बेबी हिंदुस्थान' गाडी होती पण उपयोग जास्त आमच्यासाठी कारण बापू सटपटीत पायीच जास्त फिरायचे.

बापूंचं बोलणं सौम्य होतं कधी कोणावर आवाज चढवून बोलणं ऐकलं नाही. आम्हा मुलांना कधी ओरडले नाहीत, मारणं तर दूरच.



बापूंचा स्वभाव राजकारणीपेक्षा समाजकारणी जास्त होता ते दर गुरुवारी जनसंघाच्या कार्यालयात बसून जनतेची गाऱ्हाणी ऐकत व महापालिकेमार्फत त्यांचे निवारण करीत. आमचं घर म्हणजे असंख्य लोकांचं आश्रयस्थान होतं. कितीतरी घरं बापू-आईंनी बसवली. लग्न जुळवली, समस्यांचं निराकरण केलं, आलेल्यांचं आदरातिथ्य झालं. भरपूर पुण्याई जोडली.

या काळात हाऊसिंग सोसायटीचं पर्व सुरू झालं होतं. बापूंच्या पुढाकाराने पोर्तुगीज चर्चला 'उषा' हाऊसिंग पहिली उभी राहिली. समृद्धी सोसायटीमध्ये झोपडपट्टीची चिंता होती त्यांनी बापूंना गाठलं. बापूंनी सर्व समस्या सोडवून दिल्या.

ती. बापूंची दिनचर्या ठरलेली असे. न्याहारी करून बाहेर पडले की घरी कधी येणार हा भरवसा नसे. पूर्वी संघाचे कार्यकर्ते त्यांना मधु मंत्री म्हणून संबोधित असत त्याचे सहजपणे मधुकरराव मंत्री कधी झाले ते कळलंच नाही.

या काळात जनसंघाचे दिग्गज नेते आमच्याकडे मुक्कामाला यायचे, आम्हा सर्वांना त्यांच्या संगतीची, त्यांची विचारसरणी ऐकायची संधी मिळाली. सर्वश्री अटलजी, जगन्नाथराव जोशी, बलराजजी मधोक वगैरे नेत्यांची बडदास्त ठेवण्यात गर्व वाटायचाच त्यांची शिवाजी पार्कातली दमदार भाषणं ऐकून स्फूर्ति यायची. ह्या सर्व संधी आम्हाला आयुष्यात ती. बापूंमुळे मिळाल्या. त्यातून संस्कार होत गेले.

मुंबईत हरेकृष्ण मंदिराच्या कारभारात बऱ्याच त्रुटी होत्या. कुणीतरी नाव सुचवलं आणि ते संस्थेचे टेक्निकल ॲडवायझर झाले. २ वर्षात व्यवहार सुरळीत करून दिला व त्यातून मोकळे झाले.

बापूंची आणखी एक इच्छा होती ती म्हणजे त्यांना स्वतःची बागायत करायची होती. ती इच्छा त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यांनी कर्जतला एक जागा घेतली. स्वतःच्या मेहनतीने त्यात फळाफुलांची सुंदर बाग फुलवली. एक छोटंसं घरकुल बांधलं. आजीच्या हस्ते उद्घाटन केले आणि नाव दिले मातृछाया, किती समर्पक!

आम्ही बापूंची पन्नाशी, साठी, पंचाहत्तरी आणि ऐंशी, सगळं समारंभपूर्वक साजरं केलं. त्यांच्या ८० व्या वाढदिवशी सहस्त्र चंद्रदर्शन करताना 'मधुघट' असा सुरेख अंक मी तयार केला.

बापूंना शारीरिक आजारपण कधीच नव्हतं साधं डोकंही कधी दुखल्याचं आठवत नाही. २००६ साल, नवरात्रीतील महाअष्टमीच्या दिवशी सकाळीच आईचा फोन आला. 'बापूंची तब्येत बिघडली'. त्यावेळी मी 'सप्तशती' वाचत होते. मनात शंकेची पाल चुकचुकली. मी माझं वाचन घेऊनच समृध्दीत आले व तिथेच बसून वाचत होते. त्यांचे भाऊ, आमचे काका आल्यानंतर आम्हा सर्वांसमोर त्यांनी अलगद प्राण सोडला. एक पुण्यात्मा अनंतात विलीन झाला. ८४ वर्ष घोंघावणारं वादळ शमलं होतं. मी त्यांच्या शेवटच्या क्षणी त्यांच्याजवळ होते. कसलाही त्रास झाला नाही. हीच त्यांच्या पुण्याईची पावती.

म्हणतात ना 'मरावे परी किर्तीरूपे उरावे' तसं ते असंख्य लोकांच्या हृदयात आपले ठसे ठेऊन गेले.

'तेथे कर माझे जुळती'

♦

# माझ्या आठवणीतले बापू

**– डॉ. ज्योत्स्ना कुळकर्णी**, *कन्या*

**ती.** बापूंच्या दिनचर्येत सकाळच्या ध्यानधारणेला महत्त्वाचे स्थान होते. नियमित ध्यानधारणा झाल्यावर जेवून ते सकाळी १०-१०.३० ला घराबाहेर नोकरीधंदा, महानगरपालिकेच्या मिटिंग्ज, जनतेची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जनसंघाच्या कार्यालयात- चंचल स्मृतिमध्ये जात. बैठक आटोपून घरी येण्याची वेळ निश्चित नसायची. कधी कधी रात्री ९ नंतर कार्यकर्त्यांची बैठक आमच्या घरी हॉलमध्ये असायची. चहापाण्याची सोय करायला आम्ही तत्पर असायचो. आमच्या अभ्यासाला सामाजिक परिस्थितीची जोड असायची. बी.एस.सी.चा अभ्यास करताना आम्ही दोघी बहिणी जागरण करायचो. कधी बापू रात्री बैठक आटोपून हळुवार चावीने दार उघडून आत शिरले तर पुस्तक पुढ्यात ठेवून डुलक्या काढताना आम्हाला पाहून गायचे...'लागली समाधी ज्ञानेशाची, इंद्रायणी काठी...' आम्ही दचकून जाग्या व्हायचो. ते म्हणायचे, झोपा आता, सकाळी उठून अभ्यास करा.

बापूंच्या व काकांच्या व्यक्तिमत्त्वावर शिस्त, सातत्य व समाजसेवेचे संस्कार झालेले प्रकर्षाने जाणवायचे. 'विवेक' व 'ऑर्गनायझर' ही साप्ताहिक वर्तमानपत्रे सायकलवरून येणारे अभ्यंकरकाका गॅलरीकडे द्यायचे. त्या वाचनासाठी बापू नेहमी आतुर असायचे. गुरुपौर्णिमेची शाखेला वर्गणी देण्यातही बापूंचा हात उजवा असायचा. एकेरी पालकत्वाच्या भूमिकेत आमच्या आजींनी (बापूंची आई) बापू-काकांवरच काय पण नातवंडा-पतवंडांवर केलेले संस्कार हा मंत्री कुटुंबियांचा अनमोल ठेवा आहे.

आता जुलै १९७७ चा एक किस्सा... माझ्या लग्नासाठीचं पहिलंच स्थळ जुहूचे श्री. सुभाष कुळकर्णी. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे कोणत्याही बागेत किंवा घरात चहा-पोह्यांचा कार्यक्रम करायचा नव्हता म्हणून मग काकांच्या शाळेत- विद्यानिधीत रविवारी संध्याकाळी भेटायचं ठरलं. अचानक दुपारी बाबुजींचा (सुधीर फडके) बापूंना फोन आला व ग्राहक पंचायतीची बैठक बोलावली गेली. त्याकाळी नुकतीच १९७५ साली स्थापन झालेली ही संस्था नावारूपाला येत होती. बऱ्याच गोपनीय बैठका व्हायच्या. नविन कार्यप्रणाली आखली जायची व ह्या कार्याला तर बापूंनी झोकूनच घेतलं होतं. बापू आईला म्हणाले, मी मिटींगला जातो पण ठरल्याप्रमाणे तुम्ही जुहूला जा. मी नंतर त्यांना भेटीन. जाण्यापूर्वी आईच्या सांगण्यावरून कुळकर्ण्यांना बापूंनी फोन करून कळवलं. मला तातडीनं जावं लागतंय. इतर मंडळी जुहूला येतील. गैरहजेरीबद्दल दिलगिरी व्यक्त करून बापू मोकळे झाले. बापूंची समाजसेवेची ओढ. अर्थात नवनिर्मितीचा ध्यास, ग्राहक चळवळ सर्वत्र पसरविण्याचं स्वप्न आम्हाला माहीत असलं तरी, नवीन संबंधी काय म्हणतील हा विचारही त्यांच्या मनात आला नाही. पण त्यांच्याच पुण्याईने हे नातेसंबंध जुळून आले.

♦

## सतत संपर्क

संस्थेच्या मध्यवर्ती कार्यकारिणीत कार्यवाह म्हणून निरलसपणे काम केलेल्या **सुनिताताई अभ्यंकर** आता वयोमानामुळे क्रियाशील राहू शकत नाहीत. मात्र मधुकररावांच्या कार्यशैलीची वैशिष्ट्ये त्यांनी नेमकेपणाने सांगितली. त्या म्हणाल्या की कार्यकर्त्यांच्या सतत संपर्कात राहणे अतिशय महत्त्वाचे आहे, असे नुसते सांगत नसत तर स्वत:ही तसे वागत असत. तसेच कार्यकर्त्यांना काही समस्या असेल, तर ती तातडीने सोडविण्यावर त्यांचा कटाक्ष असे.

याविषयी स्वानुभव सांगताना १९८५ नंतर विभागीय समित्या स्थापन झाल्या, त्यावेळची घटना त्यांनी सांगितली- 'विभागीय समित्यांनी आठवड्यातून एकदा भेटावे, कार्यकर्त्यांची सभा घ्यावी, हे बरोबरच होते. पण ती कोणाच्या तरी घरी घ्यावी लागे. ते नेहेमी शक्य होईल असे नाही. ही अंधेरी विभागाची अडचण त्यांनी जातीने लक्ष घालून सोडविली. जिथे संघ सुरू आहे आणि थोडीफार जागा मिळणे शक्य आहे, अशा चंद्र-रश्मी सोसायटीत आम्ही दोघे गेलो. काम झाले. विभागाच्या साप्ताहिक सभा नियमितपणे तिथे होऊ लागल्या.' अशी मदत करायला ते नेहेमी तत्पर असत. कार्यकर्त्यांच्या अडचणी दूर करण्याने संस्थेला बळकटी आली, कारण कार्यकर्ते जोडलेले राहिले.

**शब्दांकन – वसुंधरा देवधर**

# Compassionate!

**- Naina K. Kulkarni,** *Daughter*

It was around 1957, when Bapu got a good job offer in Indian Sailors Home, Masjid Bunder. This was a sudden royal change. We moved to Masjid Bunder bungalow, where Bapu had a royal cabin on ground floor and spacious apartment above.

The lavish house brought inconvenience to Tai Dada who schooled at Chhabildas school. But aaji was of great help to shuttle the gap by train. Having no Marathi School in the vicinity, I was admitted in an English Medium nursery. Days passed in adjustments. However, Bapu was trying to adjust with the new life pattern, where on one side was comfort and on the other side was his inner struggle. The sailors would come with their problems at odd hours, sometimes drunk. Bapu could overcome that. However the moment the sailors realized that Bapu was a man of principles and discipline, to sanction their leave and other requirments, they adopted a smart idea of getting chocolates and gifts for us. This was a turning point. The rarest quality of instant decision, despite the tempting luxury on the other side Bapu kicked off the job and we moved back to Dadar. We were blessed to learn so much at that raw age which was our foundation. With not a word from the family, Aaji and Aai supported Bapu. They were his strength.

I vividly remember one more incidence of my school life. There was a delay in paying fees by some girls. It was exam day and all the girls were hunted out and deprived of giving the exam. I was perhaps in sixth grade. I ran home gasping and crying. Bapu was at home. He immediately dressed up and consoled me to school to meet the principal. He showed her the rules for humiliation and ensured that all girls were given the lost time. However busy he was with his social activities, we were his priority. Aai would jokingly ask us to take Bapu's signature on our report cards so that he knew in which grade we studied.

In 1977, I got a job in Union Bank of India, Nariman point H.O., where a Parsi colleague was going through a bad patch of wrong marriage decision and divorce litigation. She had a Special girl child aged 4. When I narrated her story at home, Bapu immediately consoled her with police protection and freed her from the marriage abuse. She looked upon Aai-Bapu as parents as she was all alone. The 4 year old grew up in a special school at Madras and fixed up her own marriage at 18 yrs. Aai- Bapu have many more such virtuous stories to their credit, and perhaps we all are the beneficiaries of those blessing today. ♦



**1959 - Indian Sailors Home, Football Team**

# MGP was his Passion

**- Paras Mantri,** *grandson*

**Selfless Attitude :**

**"I always wondered why somebody doesn't do something about that. Then I realized I was somebody."**

Bapu abjoba had personified this statement in true sense and led to the genesis of his focus on Consumer Protection drive.

Bapu was so passionate about his work that it took a few days for him to realise that he will not be able to visit Grahak Bhavan every day after he met with a minor accident in 2003 He used to get from his bed with his leg in a cast of plaster and try dressing up to visit Grahak Bhavan. Convincing him to rest was not easy.

Bapu was a visionary and together with his other eminent colleagues he set a strong foundation for Mumbai Grahak Panchayat (MGP), which is getting stronger by each passing day. Bapu always reinstated that 'United consumers are strong and divided consumers are at the mercy of Corporates.'

I can never forget the passion Bapu ajoba had while he articulated the mission, supply chain dynamics and social service mindset of MGP to the German research team who visited home, along with a few other office bearers of MGP to interview Bapu ajoba.

The tribute to his years of meticulous execution of consumer protection, passion and leadership stays forever as Madhukar Mantri Chowk at Juhu- a proud memory for all of us. The road layout of Sant Dynaneshwar Marg, a road that connects Madhukar Mantri Chowk and Grahak Bhavan is symbolic, as Madhukar always used his Dnyan (Knowledge) for benefit of Grahak (Consumer). ♦



**मुं.ग्रा.पंचायतीला मिळालेला राष्ट्रीय पुरस्कार पंतप्रधान नरसिंहराव यांच्याकडून स्वीकारताना – १९९२**

# ग्राहक हिताय, ग्राहक सुखाय...

– नीता खांडेकर,
*मुक्त पत्रकार*

१९७४ साली महागाई विरुध्द आंदोलन करण्यासाठी जनसंघाचे काही कार्यकर्ते दादर स्टेशनला उपोषणास बसले होते. त्यांचे नेते होते मधुकर दत्तात्रय मंत्री. उपोषण चालू असताना, एक माणूस संध्याकाळी आला आणि मंत्री यांच्या कानास लागला. मंत्री ही बातमी ऐकून एकदम चमकले. सहा वाजेपर्यंत अन्नसत्याग्रह चालू राहणार होता. ती वेळ झाल्यानंतर इतर कार्यकर्त्यांना मंत्री म्हणाले, चला माझ्याबरोबर. कुठे जायचे? काय घडणार आहे ते लवकरच कळेल आणि झपाझप पावलं टाकत मंत्री दादरच्या कबुतरखान्यापर्यंत पोहोचले. निदर्शने करायला सुरुवात करा, असं मंत्री यांनी सांगताच, प्रचंडसंख्येत जमलेल्या जमावाने महागाई विरोधी निदर्शने करण्यास सुरुवात केली आणि मंत्री एका गोडाऊनमध्ये पोचले, 'डालडा' वनस्पती तुपाचा बराच साठा तिथे करून ठेवला होता. मधुकर मंत्री यांनी गोडाऊनच्या मालकाला म्हटलं, ''बाजारात डालडा नाही, आणि इथे तर माल खचाखच भरलेला आम्ही ॲक्शन घेणार. कशी ते बघत राहा. घाबरू नकोस. आम्ही लूटालूट करणार नाही पण तुम्हाला धडा शिकवल्याशिवाय मात्र राहणार नाही.''

ताबडतोब मधुकर मंत्री यांनी कंट्रोलर ऑफ रेशनिंगच्या ऑफिसला आणि दादर पोलीस स्टेशनला फोन केला आणि सांगितलं, ''कायद्याच्या भाषेत बोलायचं नाही. मानवतावादी समाजाचं हित लक्षात घेऊन ह्या साठ्याचं वाटप समप्रमाणात सगळ्यांना करायचं आणि ते सुध्दा बाजारभावाने आताच्या आता.''

जमलेला जनसमूह आणि मधुकर मंत्री यांचा आवेश बघितल्यावर, पोलीस किंवा रेशनिंग कंट्रोलर यांनी कुणीही खळखळ केली नाही व गरजूंना डालडाचं वाटप योग्य दरात केलं गेलं.

या घटनेमधूनच सर्वच जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्याची कल्पना मधुकर मंत्रींना सुचली. त्याआधी पुण्याला बिंदू माधव जोशी यांनी नारळाच्या वाटपाचा प्रयोग केला होता. त्याच धर्तीवर तांदूळ, गहू, डाळीपासून अन्य जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करावे हा मंत्रींचा विचार पक्का झाला. हा विचार पक्का झाल्यावर 'ग्राहकांची संघटना' ह्या संकल्पनेचा पाठपुरावा करून, एक बैठक घेतली गेली व ठोकभावाने माल खरेदी करून तो ग्राहकांना पुरवायचा असं या बैठकीत ठरलं. आणि मुंबई ग्राहक पंचायत ह्या संघटनेची मुहूर्तमेढ रोवली गेली.

पंचवीस कुटुंबांचा एक गट अशा तऱ्हेने पहिल्यांदा गट स्थापन झाले. ह्या कामाला गृहिणींचा सहभाग चांगला मिळाला. सुरुवातीला अनेक महिला तराजूनी पदार्थ मोजून देऊन वाटप करायच्या.

जिथं पिकतं, तिथूनच माल विकत घेऊन आणि काही माल होलसेल बाजारात खरेदी करून, उत्तम दर्जा, योग्य वजन, रास्त भाव आणि स्वच्छ माल हे ब्रीद ग्राहक पंचायतीनं आपल्या समोर ठेवलं होतं.

महाराष्ट्राबाहेरही ब्याडगी, गुंटूर अशा ठिकाणी जाऊन महिला मिरच्यांची खरेदी करू लागल्या. मालाची भेसळ होत नाही ना, यावर लक्ष ठेवू लागल्या. अनेक कार्यकर्ते सेवाभावी वृत्तीने कार्य करू लागले आणि पंचायतीचा पसारा वाढू लागला.

वैयक्तिक जीवनातील आघात मधुकर मंत्री यांनी धैर्याने सोसले पण सार्वजनिक कामात कधी खंड पडू दिला नाही. ते एकदा म्हणाले होते, ''जनसंघाचं काम करीत होतो. पण माझा मूळचा पिंड समाजसेवेचा त्यामुळे मी राजकारणातून बाहेर पडलो, तो पुन्हा तेथे न जाण्याचा निर्धार करूनच. मुंबई ग्राहक पंचायतीमध्येसुध्दा राजकारणी लोकांचा हस्तक्षेप होणार नाही याची आम्ही काळजी घेतो.'' कोणत्याही प्रसिध्दीसाठी ग्राहक पंचायतीचं काम केलं जात नाही. तर सामान्य माणसाचं जीवन सुसह्य कसं होईल हाच एकमेव विचार मुंबई ग्राहक पंचायतीतर्फे केला जाई.

***(मधुकर मंत्री यांच्या पंच्याहत्तरीनिमित्त लोकसत्तामध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखाचा संपादीत अंश)***

♦

# घडामोडी - महारेरा विषयक

– ॲड. शिरीष देशपांडे

## सलोखाकारांसाठी कार्यशाळा संपन्न

रविवार, ५ डिसेंबर २०२१ रोजी अंधेरी येथील सिंफनी बँक्वेट हॉलमधे संस्थेच्या Conciliatorsसाठी Skill Development Workshop आयोजित करण्यात आले होते. या कार्यशाळेत ३६ Conciliators सहभागी झाले. यात काही नवे आणि नव्याने नेमले जाऊ शकणारे असेही काही कार्यकर्ते सहभागी झाले होते.

या कार्यशाळेला दिल्ली येथील ज्येष्ठ ॲडव्होकेट आणि प्रशिक्षक जे. पी. सिंग यांनी संबोधित केले. सर्व उपस्थित Conciliatorsनी हे प्रशिक्षण उत्तम आणि बहुमोल असल्याची पावती दिली आहे. कार्यशाळेच्या सुरुवातीला कार्याध्यक्ष शिरीष देशपांडे यांनी जे. पी. सिंग यांचे स्वागत करताना महारेरा सलोखा मंचाची निर्मिती आणि त्याची कार्यप्रणाली उपस्थितांना समजावून सांगितली. कार्यक्रमाच्या अखेरीस जे. पी. सिंग यांनी इतक्या मोठ्या प्रमाणावर देशात अन्यत्र कुठेही Conciliationचे काम आजवर आढळून आलेले नाही असे सांगत संस्थेच्या या सलोखा मंचाच्या योगदानाबद्दल प्रशंसा केली.

सुरुवातीला सर्व मान्यवर आणि उपस्थितांचे डॉ. अर्चना सबनीस यांनी स्वागत केले. प्रशिक्षक जे. पी. सिंग यांची ओळख ॲड. पूजा जोशी-देशपांडे यांनी केली तर आभार प्रदर्शन आणि समारोप शर्मिला रानडे यांनी केला.

♦

## सलोखा मंचाबाबत महारेरा करणार वकीलांना प्रशिक्षित

महाराष्ट्र टाइम्स आणि मुंबई ग्राहक पंचायतीच्या संयुक्त विद्यमाने ३० नोव्हेंबर रोजी महारेरा सलोखा मंचाबाबत प्रबोधनपर ऑनलाईन वेबिनार संपन्न झाला. या वेबिनारमधे म.टा.चे ज्येष्ठ पत्रकार वैभव वझे यांनी महारेरा अध्यक्ष अजोय मेहता, संस्थेचे कार्याध्यक्ष शिरीष देशपांडे आणि नारेडकोचे उपाध्यक्ष डॉ. निरंजन हिरानंदानी यांची मुलाखत घेतली. सुरवातीला म.टा.चे निवासी संपादक श्रीकांत बोजेवार यांनी सर्व मान्यवर आणि उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. अर्चना सबनीस यांनी प्रश्नोत्तरांच्या सत्राचे संचालन केले तर अनिता खानोलकर यांनी त्यांच्या आगळ्यावेगळ्या पद्धतीने आभार प्रदर्शन केले.

सलोखा मंचात महारेरा प्राधिकरणाकडून पाठवल्या जाणाऱ्या तक्रारींमधील वकीलांचा सहभाग, त्यामुळे सलोखा घडवून आणण्यात येत असलेल्या अडचणींकडे ॲड. शिरीष देशपांडे यांनी अजोय मेहता यांचे लक्ष वेधले. वकीलांना सलोखा मंचात प्रतिनिधित्व करताना त्यांची भूमिका काय असावी याबाबत महारेराने वकीलांसाठी एक प्रशिक्षण शिबीर आयोजित करावे असे देशपांडे यांनी सुचवले. ही सूचना तत्काळ स्वीकारत अजोय मेहता यांनी असे प्रशिक्षण लवकरच महारेरातर्फे आयोजित केले जाईल असे जाहीर केले.

♦

## ग्राहक पंचायत महाराष्ट्रच्या चातुर्मास सोहळ्याची सांगता

ग्राहक पंचायत महाराष्ट्र या ग्राहक संघटनेने मागील ४ महिने आयोजित केलेल्या ग्राहक प्रबोधनपर चातुर्मास सोहळ्याची सांगता २८ नोव्हेंबर रोजी आपल्या संस्थेचे कार्याध्यक्ष शिरीष देशपांडे यांच्या समारोपाच्या भाषणाने झाली.

३२ जिल्ह्यांतील २२७ तालुक्यांत दृकश्राव्य माध्यमांद्वारे प्रसारीत झालेल्या या कार्यक्रमात बोलताना ॲड. शिरीष देशपांडे यांनी मा. बिंदुमाधव जोशींचे ग्राहक चळवळीतील योगदान अधोरेखित करतानाच ग्राहक संस्था आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण होण्यासाठी कोणते उपक्रम हाती घ्यावेत याबद्दल मार्गदर्शन केले. ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉ. विजय लाड यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता. महाराष्ट्रातील अनेक भागांतून शिरीष देशपांडे यांच्या समयोचित मार्गदर्शनपर भाषणाबद्दल आभार व्यक्त करणारे संदेश प्राप्त झाले असून राज्यातील अनेक वर्तमानपत्रांनीसुद्धा या कार्यक्रमाला ठळक प्रसिद्धी दिली.

♦

# पुनरागमन - ग्राहक पंचायत पेठांचे

सन २०२०-२१ या सक्तीच्या मध्यंतरानंतर ग्राहक पंचायत पेठा आता पूर्वीच्याच उत्साहात आणि जल्लोषात संपन्न होत आहेत.

७ जानेवारी ते ११ जानेवारी २०२२ या कालावधीत पुणे येथे पंचायत पेठाचे आयोजन करून आपण नवीन वर्षाचे स्वागत करत आहोत. तर त्या पाठोपाठ १३ जानेवारी ते १७ जानेवारी २०२२ या कालावधीत दापोली येथे ग्राहक पंचायत पेठेचे आयोजन करण्यात आले आहे. अनेक नाविन्यपूर्ण उत्पादनांनी सजलेल्या या पंचायत पेठा सध्याच्या सर्व सरकारी नियमांचे काटेकोर पालन करूनच आयोजित करण्यात आल्या आहेत. २०२२ वर्षातील पहिला गोड सण संक्रांतीचा, या सणाचे औचित्य साधत आयोजित करण्यात आलेल्या पंचायत पेठांना चोखंदळ पुणेकर आणि दापोलीचे ग्राहक नक्कीच भरभरून प्रतिसाद देतील ही खात्रीच आहे.

समस्त ग्राहकांना आणि कार्यकर्त्यांना नवीन वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! आणि पंचायत पेठांना भेट देण्यासाठी आग्रहाचे निमंत्रण.

**– ग्राहक पंचायत पेठ समिती**

| पुणे व दापोलीत पंचायत पेठा – २०२२ | | | |
|---|---|---|---|
| **स्थळ** | **स्थळ** | **तारीख** | **वेळ** |
| पुणे | हर्षल हॉल, कर्वे रोड, पुणे | ०७ जाने. ते ११ जानेवारी २०२२ | सकाळी ११.०० ते ८.३० |
| दापोली | टिळक स्मारक हॉल, दापोली | १३ जाने. ते १७ जानेवारी २०२२ | सकाळी ११.०० ते ८.०० |



**प्रतिसाद**

# कौतुक आणि अभिनंदन

दर महिन्याचे ग्राहक अंक वाचनीय असतात. संग्राह्य असतात. एकूण आपल्या ग्राहक पंचायतीची प्रगती खरच डोळे दिपवणारी आहे हे नक्की. वीज कंपनीवर ग्राहक प्रतिनिधी म्हणजे गौरवाची गोष्ट.




नेहमी अंकातून स्पर्धा, बगीचा, तक्रार मार्गदर्शन, विविध संघाची प्रगती तसेच अग्रलेख, कलाकुसर, पदार्थ अशी विविधता असते. मी तर माझ्या शेजारी राहणाऱ्या मैत्रिणीला ग्राहक अंक वाचायला देते. सप्टेंबरच्या अंकातील मुलाखत, पती-पत्नी और वो तर फारच खुसखुशीत. सर्वच हे जुने कार्यकर्ते म्हणजे इमारतीचा पाया. भालचंद्र नाईक उभयता, दिघे उभयता यांच्या आठवणी जागल्या. मालती आठवले यांचेकडे बैठका व्हायच्या. त्यांच्या आऊटहाऊसमधे.

प्रमोद देवधर यांचा खुसखुशीत की नरम लेख फार आवडला. वेफर्स वगैरेचे केलेले वर्णन फारच तंतोतंत.

बिल्डर, विकासक वगैरेचा लेख ती योजना, कल्पना फारच मस्त. वेगळी म्हणजे भांडण मिटून न्याय मिळू शकेल अशी शक्यता.

जास्त लिहीत नाही. पण एकही विषय मार्गदर्शनातून सुटत नाही. हेच कौतुक.

आप्पा गोडबोले यांना मनःपूर्वक शुभेच्छा. पूर्वी दादरमधे होणाऱ्या ग्राहक बैठकीत त्यांचे मार्गदर्शन आठवते.

पत्र खरंतर फक्त, कामाचं कौतुक, संघाची प्रगती, नवे काम तळमळीने करणारे कार्यकर्ते यासाठी अभिनंदन करण्यासाठी. पण हे सर्व फोनवर कुणाशी बोलणार. पत्र जुनं ते माध्यम माझ्या सोईचे. आधुनिक यंत्रणा माझ्यापासून सुदूर. अक्षर समजून घ्यावे. भावना महत्त्वाच्या. शुभदा ताई, लेखन मस्त असतं तुमचं सर्वांना नमस्कार.

**– मंगला नातू**



कुटुंबियासमवेत




माजी अध्यक्ष, कै. रामदास गुजराथींकडून स्वागत



जनता मध्यवर्तीच्या अरविंद दिघे यांच्यासह




'मधुकरराव मंत्री चौक' उद्‌घाटन सोहळा माननीय राम नाईक यांच्या हस्ते

• Postal registration No. MCN/158/2020-2022 • WPP License No. MR/TECH/WPP-137/North/2020-2022
• License to post without prepayment, on 5th & 6th • Vile Parle (W) P.O. Mumbai 400 056
RNI No. MAHBIL/2011/39044




राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारल्यानंतर पंतप्रधान नरसिंहराव आणि अन्य मान्यवरांसमवेत



इंटरनॅशनल सिंधी असोशिएशनतर्फे त्यावेळचे राज्यपाल डॉ. शंकर दयाल शर्मा यांच्या हस्ते 'झुलेलाल ॲवॉर्ड' स्वीकारताना – १९८७

## श्री. मधुकर मंत्री यांना सामाजिक कार्यासाठी मिळालेली विविध स्मृतिचिन्हे, पुरस्कार व सत्कार

- इंटरनॅशनल सिंधी असोसिएशनकडून त्यावेळचे राज्यपाल डॉ. शंकरदयाल शर्मा यांच्याकडून झुलेलाल ॲवॉर्ड (१९८७)
- डॉ. प्रभाकर पै महापौर असताना उत्कृष्ट नगरसेवक म्हणून सत्कार (१९८२)
- 'मुंबई सकाळ'तर्फे पक्षातीत भूमिकेतून ग्राहकोपयोगी सामाजिक कामाबद्दल पुरस्कार
- शिवसेना खेतवाडीतर्फे सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार
- ग्राहक पंचायतीला मिळालेला राष्ट्रीय पुरस्कार १९९२ साली पंतप्रधानांकडून स्विकारला.
- मा. लालकृष्ण अडवाणी अध्यक्ष भा.ज.पा. यांनी दि. ९ जानेवारी १९९३ रोजी ज्येष्ठ कार्यकर्ता म्हणून केलेला सत्कार.
- १९९६ भा.ज.पा. काळबादेवी कार्यालयाच्या उद्‌घाटनप्रसंगी श्री. अडवाणी यांच्याकडून श्रीगणपतीची प्रतिमा भेट.